# वसई-विरार शहर महानगरपालिका

## सुधारित अर्थसंकल्प सन २०१३-१४ सह सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत मा.आयुक्त यांची टिपणी

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९५ नुसार सन २०१३-१४ च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकासाठी उत्पन्न व खर्चाचे अंदाज तयार केले आहेत. याच अधिनियमाचे कलम ९६ नुसार सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत सविस्तर विचार विमर्ष करुन अर्थसंकल्प मा. महासभेपुढे सादर करणेस मा. स्थायी समितीच्या शिफारशीसाठी मा. स्थायी समिती सभेची सूचना क्र. ३९ दि. ३०/०१/२०१४ नुसार सन २०१३-१४ च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०१४-१५ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मा. स्थायी समिती सभेपुढे सविनय सादर.

अर्थसंकल्पीय गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | प्रारंभिक शिल्लक | जमा रकमा | प्रारंभिक शिलकेसह एकूण | खर्च रकमा | अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| सन २००९-१० | २३ कोटी ५२ लक्ष | १३८कोटी ७१ लक्ष | १६२ कोटी २२ लक्ष | १४० कोटी ३४ लक्ष | २१ कोटी ८८ लक्ष |
| सन २०१०-११ | २१ कोटी ८८ लक्ष | ३६७कोटी ४०लक्ष | ३८९ कोटी २८ लक्ष | १५७ कोटी ८२ लक्ष | २३१ कोटी ४७ लक्ष |
| सन २०११-१२ | २३१ कोटी ४७ लक्ष | ५२१ कोटी ६१ लक्ष | ७५३ कोटी ८ लक्ष | २९९ कोटी ७ लक्ष | ४५४ कोटी |
| सन २०१२-१३ | ४५४ कोटी | ६२५ कोटी २२ लक्ष | १०७९ कोटी २२ लक्ष | ४१४ कोटी ७९ लक्ष | ६६४ कोटी ४३ लक्ष |
| सन २०१३-१४ | ६६४ कोटी ४३ लक्ष | १०२१ कोटी ४२ लक्ष | १६८५ कोटी ८५ लक्ष | १३१७ कोटी ५१ लक्ष | ३६८ कोटी ३४ लक्ष |
| सन २०१४-१५ | ३६८ कोटी ३४ लक्ष | २११४ कोटी ९२ लक्ष | २४८३ कोटी २६ लक्ष | २४०० कोटी ६५ लक्ष | ८२ कोटी ६१ लक्ष |

महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारांमुळे भविष्यातील वाढीव लोकसंख्येस पुरवावयाच्या सुविधांचा आर्थिक भार नव्याने विकसीत होणाऱ्या बांधकामांच्या विकासकाकडून परस्पर वसुल केला जात असून परिणाम स्वरुप सद्याच्या करदात्यांवर कोणताही आर्थिक बोजा न पडता वार्षिक ₹ १६० कोटी उत्पन्नाचा कायम स्वरुपी स्त्रोत उपलब्ध झाल्याने विकासास गती प्राप्त झाली आहे.

सॅटेलाईट सिटीसाठी संपूर्ण भारतातून निवडल्या गेलेल्या आठ शहरांपैकी वसई विरार शहर महानगरपालिका हि महाराष्ट्रातील एकमेव महानगरपालिका ठरली असून या (यु. आय. डी. एस. एस. टी / यु. आय. डी. एस. एस. एम. टी.) योजने अंतर्गत ₹ ६६.६७ कोटी अनुदान भुयारी गटर योजनेसाठी, ₹ ३४.४२ कोटी अनुदान घनकचरा व्यवस्थापनासाठी ₹ ८६२ कोटी अनुदान पाणीपुरवठा योजनेसाठी प्राप्त होणार असुन यापैकी सन २०११-१२ ते नोव्हेंबर २०१३ अखेर ₹ २२ कोटी ०४ लक्ष निधी प्राप्त झाला आहे. सन २०१३-१४ मध्ये उर्वरीत कालावधीत ₹ २२ कोटी ४ लक्ष व सन २०१४-१५ मध्ये ₹ ५८०कोटी ४१ लक्ष अनुदान प्राप्त होणार आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत पाणीपुरवठ्यासाठी सुर्या विस्तारित १०० द.ल.ली. पाणीपुरवठा योजना वितरण व्यवस्थेसाठी ₹ १३५ कोटी अनुदान मंजुर झाले असुन प्राप्त होणार आहे. जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थापन महाअभियान योजनेअंतर्गत मोनोरेलसह रिंगरोड व्यवस्थेसाठी ₹ ७५ कोटी अनुदान अपेक्षित आहे. स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर व मा. विधानपरिषद उप सभापती श्री. वसंतरावजी डावखरे यांचेनिधीतुन ₹ ८ कोटी ७० लक्ष ५३ हजार इतका निधी प्राप्त झाला आहे. एकात्मिक तलाव संवर्धन योजनेअंतर्गत तलाव विकासासाठी ₹ १ कोटी ६७ लक्ष अनुदान प्राप्त झाले असुन सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये प्रतीवर्षी १७ कोटी ५० लक्ष अनुदान अपेक्षित आहे. राजीव आवास योजनेअंतर्गत सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये प्रतीवर्षी ₹ १५ कोटी अनुदान अपेक्षित आहे. मत्स्य विकास महामंडळाकडून मार्केट विकासासाठी ₹ २ कोटी २१ लक्ष ९४ हजार अनुदान प्राप्त झाले असुन सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये प्रतीवर्षी ₹ १ कोटी २५ लक्ष अनुदान अपेक्षित आहे. रस्ता रुंदीकरणात बाधीत होणारे पोल हटवण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून ₹ ३ कोटी १९ लक्ष अनुदान प्राप्त झाले असुन रस्ता रुंदीकरणात बाधीत होणारे वृक्ष पुनप्रत्यारोपणासाठी ₹ १ कोटी १५ लक्ष अनुदान प्राप्त झाले आहे.

शासनाने १ एप्रिल २०११ पासुन आपल्या महानगरपालिका क्षेत्रात सक्तीने लागू केलेल्या स्थानिक संस्था करा मुळे वार्षिक ₹ २५० कोटी चा उत्पन्न स्त्रोत निर्माण झाला आहे. प्रथम वर्षी ₹ ९३ कोटी ४२ लक्ष द्वितीय वर्षी प्रत्यक्ष ₹ १६९ कोटी ७२ लक्ष तिसऱ्या वर्षी नोव्हेंबर अखेर ₹ १०३ कोटी ४३ लक्ष निधी प्राप्त झाला असुन सन २०१३-१४ उर्वरीत कालावधीत ₹ १५६ कोटी

७३ लक्ष तसेच २०१४-१५ मधे ₹ २८६ कोटी ६ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे. अपेक्षित उत्पन्नात मागील थकीत उत्पन्नासह नैसर्गिक वाढ गृहीत आहे.

वसई नगरपरिषदेने अपरीहार्य कारणांमुळे थकीत ठेवलेल्या कर्जावरील विलंब आकार ₹ १४ लक्ष माफी सन २०१२-१३ मध्ये प्राप्त झाली आहे.

नियोजन विकासाचे प्राधिकार, सॅटेलाईट सिटीसाठी झालेली महानगरपालिकेची निवड, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना, जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थापन महाअभियान योजना, एकात्मिक तलाव संवर्धन योजना तसेच राजीव आवास योजना या योजनांसाठी महानगरपालिकेचा समावेश करुन घेऊन अनुदान मंजुर करणे, स्थानिक संस्था करासाठी व्यापारी व उद्योजकांचे सहकार्य, कर्जावरील विलंब आकारातील माफी या बाबी मा. खासदार श्री. बळीरामजी जाधव, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर, मा. आमदार श्री. विलासजी तरे मा. प्रथम महापौर राजीवजी पाटील, मा. महापौर श्री. नारायणजी मानकर यांचा सातत्यपुर्ण पाठपुरावा व मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर यांचे विशेष प्रयत्नांची फलश्रुती आहेत.

स्थानिक संस्था कर, नगररचना विभागाचे उत्पन्न, केंद्र व राज्यशासनाच्या महानगरपालिकांसाठीच्या विविध योजना या मधून विकासासाठी आवश्यक निधी प्राप्त होणार असुन महानगरपालिकेच्या धोरणानुसार सन २०१४-१५ मधे कोणतीही नविन कर आकारणी अथवा कराचे दरात वाढ नव्याने प्रस्तावित केलेली नाही.

महानगरपालिकेसाठी अनेक महत्वाकांक्षी योजना अंमलात आणण्याचा मानस असून त्याची संक्षिप्त माहिती अर्थसंकल्पात अन्यत्र नमुद केली आहे. या योजना अंमलात आणण्यासाठी स्वनिधीची आवश्यकता आहे. महानगरपालिकेचा कर रुपाने जमा होणारा निधी वेळीच उपलब्ध होणे महत्वाचे आहे, सबब दृष्टीक्षेपातील योजना विचारात घेता पुढील पाच वर्षाचा मालमत्ता कर, पाणीपट्टी याबाबतच्या रकमा आगाऊ जमा करतील अशा मालमत्ता व नळ जोडणी धारकांना एकत्रित मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या १०% पर्यंत सुट देण्याचा निर्णय आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टीची चालू मागणी विचारात घेता ५०% रक्कम जरी या योजने अंतर्गत महानगरपालिकेकडे आगाऊ जमा झाली तरी ₹ २८० कोटी इतका निधी एकरकमी प्राप्त होऊ शकतो व महानगरपालिकेस त्याप्रमाणात कमी कर्ज उभारणी करावे लागून सदर रक्कम अत्यंत सहजपणे उपलब्ध होईल. करदात्यांना १०% या नियमीत सर्वसाधारण व्याज दराच्या फायदयासह नागरी सुविधांसाठी आपल्या जिव्हाळयाच्या संस्थेत आपल्या सोयीसाठी खारीचा वाटा उचलल्याचे मानसिक समाधान व सामाजिक सन्मान मिळेल. सदर निर्णयास अधिक - अधिक प्रसिध्दी देण्यात येणार असुन करदात्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद याद्वारे अपेक्षित आहे. या व्यतिरीक्त असा आगाऊ कर जमा करणाऱ्या मालमत्ता धारकांना व त्यांचे कुटुंबीयांना अपघाती विमा संरक्षण देण्याचा प्रस्ताव आहे.

विकास आराखडा अभ्यासुन तद्नुसार कामाचे नियोजन करुन नियोजनबद्ध विकास करणेसाठी कृती आराखडा तयार करणेची कार्यवाही पुर्ण झाली असल्याने आता पुर्ण क्षमतेने

जलद गतीने विकासकामे समाधानकारक रित्या पुर्ण होतील असा विश्वास आहे. सन २०१४-१५ मध्ये हाती घ्यावयाच्या अनेक कामांबाबत सन २०१३-१४ अखेर प्रशासकिय वित्तीय मान्यता व तांत्रीक मंजुरी देणेची कार्यवाही पुर्ण झाली असल्याने नियाजीत कामे मुदतीत पुर्ण होणे अपेक्षित आहे. करोडो रुपयाचा उपलब्ध झालेला व होणारा विकास निधी बँकेत निरुपयोगी न ठेवता, उपलब्ध निधीचा सुयोग्य विनियोग करुन औद्योगिक वसाहत विकास, सुसज्य वैद्याकिय आरोग्य व्यवस्था, अत्याधुनिक अग्निशमन व्यवस्था, शहर परिवहन व्यवस्था यासह सुनियोजीत, सुसंस्कृत, हरित वसईचा सर्वांगीण विकास करण्याचा संकल्प आहे. त्यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य व जिवदानी मातेचे आशिर्वाद लाभावेत हि प्रार्थना.

## ❖ ठळक उत्पन्न व जमा बाबी ❖

१) मालमत्ता कर व मालमत्ता कर विभागाचे इतर उत्पन्न :- अ) एकत्रित मालमत्ता कर :- सन २०१३-१४ मधे मालमत्ता कराव्दारे ₹ ६१ कोटी ९८ लक्ष ५४ हजार उत्पन्न प्राप्त होणार आहे. नविन मालमत्तांवरील कर आकारणीसह नियमीत मागणी यापासून सन २०१४-१५ मधे ₹ ६४ कोटी ४२ लक्ष ९३ हजार इतके एकत्रित मालमत्ता कराचे उत्पन्न अपेक्षित आहे.

अ) असेसमेंट दाखला फी : असेसमेंट दाखल्याचे महत्व विचारात घेता सनद स्वरुपात सदर दाखला वापरात येत असल्याने सनदेसाठी वापरल्या जाणाऱ्या उत्तम प्रतीच्या कागदावर शक्यतो संगणकीकृत दाखला देऊन संपुर्ण महानगरपालिका क्षेत्रात प्रती दाखला ₹ २५०/- या अधिकतम प्रचलित दराने दाखला फी आकारणीचा प्रस्ताव आहे. याव्दारे सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ४ लक्ष २८ हजार व ₹ ४ लक्ष ४५ हजार उत्पन्न अपेक्षित आहे.

ब) मालमत्ता हस्तांतरण फी : मालमत्ता हस्तांतरणासाठी संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रात पुढील प्रमाणे दर लागू करणेचा प्रस्ताव आहे.

| अ.क्र. | मालमत्तेचे स्वरुप | दर |
|---|---|---|
| १ | झोपडी | प्रती चौरस फुट ₹ १/- |
| २ | पत्र्याची चाळ | प्रती चौरस फुट ₹ २/- |
| ३ | बैठे घर | प्रती चौरस फुट ₹ ३/- |
| ४ | इमारतीमधील सदनिका | प्रती चौरस फुट ₹ ५/- |

मालमत्ता हस्तांतरण कार्यवाही पुर्ण झालेनंतर संबंधित मालमत्ता धारकास त्याची माहिती उपलब्ध होण्याची आवशकता विचारात घेता मालमत्ता हस्तांतरण कार्यवाही पुर्ण झालेनंतर मालमत्ता हस्तांतरण फी व्यतिरिक्त प्रत्तेकी ₹ २५०/- प्रमाणे असेंसमेंट दाखला फी वसुल करुन दाखला निर्गमित करणे आवश्यक आहे. मालमत्ता हस्तांतरण फी व्दारे सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ १ कोटी ६९ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे.

क) मालमत्ता कर शास्ती : अनधिकृत मालमत्तांवर दुप्पट दराने शास्ती आकारण्याच्या शासकीय अधिसुचने नुसार कार्यवाही केली जात असून सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १४ कोटी ५२ लक्ष ८७ हजार व ₹ १३ कोटी १६ लक्ष ६९ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

ड) महानगरपालिकेत समाविष्ठ भुतपूर्व ग्रामिण क्षेत्रात महानगरपालिकेच्या स्थापनेपुर्वीपासुन अस्तित्वात असलेल्या मालमत्तांसाठी त्या त्या क्षेत्रातील महानगरपालिकेच्या स्थापनेच्या पुर्वीच्या प्रचलित दराने घरपट्टी, दिवाबत्ती, आरोग्य कर, सामान्य पाणीपट्टी हे कर वसुल केले जाणार आहेत. यामुळे *सद्यस्थितीत महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट भुतपुर्व ग्रामपंचायत क्षेत्रात महानगरपालिकेच्या स्थापनेपुर्वी अस्तित्वात असलेल्या मालमत्तांसाठी इतर ग्रामपंचायती पेक्षा देखील कमी कर आकारणी होणार आहे. महानगरपालिकेची संगणकीय नागरी सुविधा केंद्रे यशस्वीपणे सुरू असुन बँकामध्ये कर भरणेची उपलब्ध सुविधा, आगाऊ कर भरणाऱ्यांना कर रकमेत १०% सवलत तसेच कुटुंबीयांना प्राप्त होऊ शकणारे अपघाती विम्याच्या लाभाइतके थेट संरक्षण या पोषक बाबींमुळे सर्व करदात्यांनी १००% कर भरणा करणे अपेक्षित आहे.*

महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता कर आकारणी न झालेल्या मालमत्ता राहु नयेत यासाठी सन २०१४-१५ मध्ये प्रचलीत दर व आकारणी पद्धत विचारात घेऊन महानगरपालिकेमार्फत पडताळणी सापेक्ष स्वयंमुल्य निर्धारण करुन मालमत्ता कर भरणेची योजना लागू करण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे उत्पन्न वेळीच प्राप्त होणे अपेक्षित आहे.

मालमत्ता कर आकारणी विभागासंबधीचे वरील बाबींसह इतर सर्व बाबीं पासुन सन २०१३-१४ मधे ₹ ८० कोटी ५३ लक्ष ५२ हजार तसेच सन २०१४-१५ मधे ₹ ८० कोटी ३० लक्ष ६५ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

२) स्थानिक संस्था कर :- शासन निर्णयानुसार दि. १ एप्रिल २०११ पासुन महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक संस्था कर आकारणी केली जात असून स्थानिक परिस्थिती नुसार काही करांच्या दरात आवशक सुधारणा करण्याचा निर्णय मा. महासेभेने यापुर्वी घेतला आहे. सदर निर्णयाप्रमाणे सुधारीत दरसुचीनुसारचे दर अमलात आहेत.

भुतपूर्व नगरपरिषद क्षेत्रासाठी प्राप्त झालेले जकात कराचे उत्पन्न, होणारी नैसर्गिक वार्षिक वाढ, विस्तारीत क्षेत्र, महानगरपालिकेने कर भरण्यासाठी उपलब्ध केलेल्या सुविधा व लवचिक कार्यपध्दती, प्रोत्साहनपर सोयी सुविधा व सवलती आणि कराचे महाराष्ट्रातील सर्वात न्युनतम दर असे पोषक वातावरण विचारात घेता कोणताही उद्योग व्यवसाय स्थानिक क्षेत्रा बाहेर जाण्याचा प्रश्न उदभवणार नसल्याने जकात करा इतकेच उत्पन्न स्थानिक संस्था करापासुन देखिल अपेक्षित धरले आहे. स्थानिक संस्था कर नियमानुसार लेखे पडताळणी इत्यादी व्दारे सदर उत्पन्न भविष्यात पुढील सात वर्षापर्यत सव्याज वसुल पात्र आहे . याबाबीचा सर्वकष विचार करता स्थानिक संस्था कराव्दारे सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ २६० कोटी व ₹ २८६ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे. नोंदणी फी व्दारे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ ६ लक्ष १० हजार उत्पन्न अपेक्षित आहे.

३) पारगमन /ट्रांझीट फी :- शासनाच्या मान्यतेने महानगरपालिका क्षेत्रात पारगमन / ट्रांझीट फी वसुलीचा प्रस्ताव असुन महानगरपालिका क्षेत्रातून होणारी माल वाहतूक विचारात घेता ₹ १०० कोटी इतके अतिरीक्त उत्पन्न प्राप्त होणार असून प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु झालेनंतर अतिरीक्त अर्थसंकल्पाव्दारे सदर रक्कम विकास कामासाठी उपलब्ध होऊ शकेल.

४) जाहिरात कर, होर्डिंग व जागा भाडे :- जकात अभिकर्ता, बाजार फी वसुली ठेका यामधील यशस्वीतता व आस्थापना खर्चातील बचत विचारात घेऊन परिणामकारक रित्या जाहिरात कर वसुली कामी अभिकर्ता नेमण्याचा प्रस्ताव अंतीम टप्यात आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठीचे बसथांबे, जेष्ठ नागरिक निवारा शेड, महानगरपालिकेची उद्याने, सुशोभिकरण केलेले तलाव मजूर अड्डा इत्यादी ठिकाणी तसेच विविध विद्युत खांबावर जाहिरात करणेस परवानगी देणे, शहराच्या सौदर्यीकरणास बाधा येणार नाही अशी मोक्याची ठिकाणे निश्चित करुन सदर ठिकाणी, ठिकाणानुसार वेगवेगळ्या दराने जागा भाडे निश्चित करुन लिलाव पध्दतीने जाहिरातीस परवानगी देण्याचा प्रस्ताव आहे. याव्दारे कायम स्वरुपी उत्पन्न स्त्रोत निर्माण होणार आहे. महानगरपालिका क्षेत्रात सर्व विभागात समान दराने जाहिरात कर आकारणी केली जाईल. अधिकृत परवानगी घेऊन दिल्या जाणाऱ्या शुभेच्छा जाहिरातीसह होर्डीग्जवर कर आकारणी अंमलबजावणी करुन विनापरवानगी सार्वजनिक ठिकाणी होर्डीग्ज लावण्यावर नियंत्रण ठेवण्याचा व शहराचे विद्रुपीकरण रोखण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. जाहिरात धोरण ठरवण्यासाठी विशेष सल्लागाराची नियुक्ती केली आहे. सन २०१३-१४ मधे ₹ ४६ लक्ष ३९ हजार तसेच सन २०१४-१५ मधे ₹ ५ कोटी इतके उत्पन्न गृहीत धरले आहे. उद्याने, रस्त्यावरील पोल, बस थांबे इत्यादी जाहिरात करण्यायोग्य विविध ठिकाणे विचारात घेता सदर उत्पन्न ₹ ७ ते ८ कोटी पर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

५) अग्निशमन सेवा :- अ) सन २०१३-१४ मधे थकबाकीसह ₹ १ कोटी ५४ लक्ष ९ हजार उत्पन्न प्राप्त होणार असून सन २०१४-१५ या वर्षासाठी देखिल ₹ १ कोटी ९८ लक्ष ४३ हजार उत्पन्न प्राप्त होणार आहे.

ब) अग्निशमन सेवेचे सक्षमीकरणासाठी शासन निर्देशानुसार मा. महासभेने फेब्रुवारी २०११ मधे दिलेल्या मान्यतेप्रमाणे, वाढत्या लोकसंख्येचा आर्थिक भार सद्यस्थितीतील करदात्यांवर पडू नये म्हणून नविन निर्माण होणाऱ्या बांधकामाकरिता विकासकांकडून वसुल केल्या जात असलेल्या फायर प्रोटेक्शन फी व विशेष फायर प्रोटेक्शनफी द्वारे फायर कॅपीटेशन फी स्वरुपात सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ १७ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

क) अग्निशमन उपकर आकारणी केली जात असल्यामुळे दि. ०१ एप्रिल २०१२ पासून महानगरपालिका क्षेत्रात प्रत्यक्ष अग्निशमन सेवा निशुल्क आहे. महानगरपालिका क्षेत्राबाहेरील प्रत्तेक कॉलसाठी पहिल्या ३ तासाकरिता ₹ ४ हजार व त्यावरील प्रत्येक तासासाठी ₹ १ हजार इतके शुल्क आकारणी केले जात असून या सेवेपासून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ७ लक्ष ३२ हजार व ₹ ७ लक्ष ३५ हजार इतके इतर उत्पन्न अपेक्षित आहे.

ड) अग्निशमन मिटीगेशन प्लान तयार करून आपत्कालीन व्यवस्थापन केंद्र निर्माण केले जाणार असून त्यासाठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये प्रतिवर्षी ₹ ५० लक्ष अनुदान अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे अग्निशमन सेवेपासुन सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १९ कोटी ११ लक्ष ४१ हजार व ₹ १९ कोटी ५५ लक्ष ७८ हजार इतके एकूण उत्पन्न अपेक्षित आहे.

६) इतर उत्पन्न : अ) सिनेमा कर(प्रयोग व खेळावरील कर) :- संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रातील सिनेमा गृहे व इतर करमणूकींच्या कार्यक्रमासाठी आकारणी करण्यात येणाऱ्या प्रयोग व खेळावरील करापासून प्रत्तेक खेळास ₹ १५/- या दराने आकारणी केली जाणार असून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये अनुक्रमे ₹ ४ लक्ष ४२ हजार व ₹ ४ लक्ष ९७ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

ब) पर्यटन /श्रीक्षेत्र विकास सेवाशुल्क :- महानगरपालिका क्षेत्रातील पर्यटन क्षेत्र व श्रीक्षेत्र म्हणून लौकिक असणाऱ्या ठिकाणी भरणाऱ्या यात्रांमधील उभारले जाणारे तात्पुरते मंडप, दुकाने जाहिराती, करमणूकीचे कार्यक्रम याव्दारे स्वतंत्रपणे वसुल केल्या जाणाऱ्या शुल्क स्वरुपापासुन वार्षिक ₹ ५० हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त पर्यटन स्थळ विकास झाल्यानंतर पर्यटकांकडून महानगरपालिका स्वतंत्रपणे निश्चित करेल अशी दरडोई रक्कम प्रत्यक्ष अंमलबजावणी अंती पर्यटन व श्रीक्षेत्र विकास शुल्क स्वरुपात प्राप्त होईल.

क) भाडयाच्या गाडया व हातगाडया परवाना फी :- नव्याने हातगाडया व भाडयांच्या गाडयासाठी परवानगी न देता पुर्वीच्या हातगाडयांनी कायम स्वरुपी जागा व्यापलेल्या नाहीत याची खात्री करुन गर्दीच्या ठिकाणी असणाऱ्या गाडयांची परवानगी रद्द करणेस शिफारस आहे. वार्षिक ₹ २ हजार, पीच परवानासाठी ₹ १२००/- व अपंगांसाठी ₹ ५००/- या प्रचलित दराने संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रात आकारणी केली जाणार आहे. महानगरपालिकेने परवाना दिलेल्या हातगाडया व गाडयापासून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ६ लक्ष ४४ हजार व ₹ ११ लक्ष ६४ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

ड) इमारत भाडे / गाळा भुईभाडे :- महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्ता अल्प भाडयाने दिलेल्या आहेत. सदर मालमत्तांवर करावा लागणारा खर्च, भाडयाचा दर, कराराचा कालावधी इत्यादी बाबींचा विचार करता महिलांच्या कल्याणकारी योजनेचा भाग म्हणून सदर इमारती व गाळे महिला बचत गटांना सद्याच्या प्रचलित दराने भाडयाने देणे कामी शिफारस आहे. थकीत गाळाभुई भाडे सन २०१३-१४ मधे वसुल होणे अपेक्षित असुन इमारत व गाळा भुई भाडयापासून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ ३६ लक्ष ८७ हजार व ₹ ४० लक्ष ४० हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

इ) पे ॲण्ड पार्क वाहनतळ व्यवस्था व नो पार्किंग मधील वाहने उचलणे :- महानगरपालिका क्षेत्रात मोक्याच्या जागा निश्चित करुन दुचाकी वाहनांसाठी ₹ ५ चारचाकी वाहनांसाठी ₹ १० दराने आकारणी करुन पार्किंगची व्यवस्था करणे व नो पार्किंगमधील वाहने उचलून दुचाकीसाठी ₹ ५० व चारचाकीसाठी ₹ १०० वसुल करणेचा प्रस्ताव असुन प्रभावी अंमलबजावणीसाठी या कामकाजाचा प्रभागनिहाय ठेका देणेस शिफारस आहे. याद्वारे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये अनुक्रमे ₹ २० लक्ष ३० हजार व ₹ २० लक्ष ७५ हजार उत्पन्न अपेक्षित आहे.

ई) हॉटेल रेस्टॉरंट, परमीट रुम, बार तसेच रुग्णालयांची परवाना फी व परवाना नुतनीकरण फी या व्दारे तसेच विभागीय कार्यालय टेरेस भाडे, पटांगण भाडे, मंडप फी, नगरपरिषद औद्योगिक वसाहत लिज हस्तांतरण फी, गाळा भुईभाडे नोटीस फी, व्यायाम शाळा फी, दाखला फी, वाहन भाडे, अनुज्ञेय शिक्षण कर व रोजगार हमी कर रिबेट, जुन्या भांडाराच्या विक्रीचे उत्पन्न, निविदा फॉर्म व इतर नगरपालिका प्रकाशने विक्री, गुंतवणूकीवरील व्याज, मंडप परवानगी फी, इतर दाखले फी, व्यवसायासाठी नाहरकत दाखला व दाखला नुतनीकरण फी, जन्म मृत्यु दाखला, विवाह नोंदणी फी, जेंडर बजेट अंतर्गत व्यवसाय प्रशिक्षण फी या बाबी व उपरोक्त अ ते इ मध्ये नमुद बाबींपासुन सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ७ कोटी ४८ लक्ष ७० हजार व ₹ ७ कोटी ९५ लक्ष ५९ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

७) स्वच्छता सेवा उत्पन्न :-

अ) सर्वसाधारण स्वच्छता कर व विशेष स्वच्छता कर : मोठया नागरी क्षेत्रात समाविष्ठ झालेल्या नविन शहरी क्षेत्रात जुलै २००९ पूर्वी पासुन अस्तित्वात असलेल्या मालमत्तांसाठी प्रचलित दरानेच सर्वसाधारण स्वच्छता कर वसुल केला जाणार आहे

ब) विशेष स्वच्छता कर : महानगरपालिकेत समाविष्ठ जुन्या शहरी क्षेत्रासह संपूर्ण क्षेत्रात नव्याने निर्माण होणाऱ्या मालमत्तांसाठी समान दराने कर आकारणी केली जात आहे. सर्वसाधारण व विशेष स्वच्छता कराव्दारे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ९ कोटी १३ लक्ष ८६ हजार व ₹ ११ कोटी ५६ लक्ष ७६ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

क) बाजार फी :- महानगरपालिका क्षेत्रात शासनाच्या निर्देशानुसार मा. महापौर सो! यांचे अध्यक्षतेखाली कमिटी स्थापन करुन त्या कमिटीचे शिफारसीनुसार प्रत्येक प्रभाग समितीमधे झोन निहाय स्वतंत्र दर निश्चित करुन तसेच झोन निहाय रस्त्यावरील विक्रीते व फेरीवाले यांच्या व्यवसायाचे क्षेत्र, ना फेरीवाला क्षेत्र निश्चित करुन लिलाव पध्दतीने बाजार फी वसुल करण्याचा प्रस्ताव आहे. या पासुन सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ३ कोटी १५ लक्ष ९४ हजार ₹ ३ कोटी ५६ लक्ष ७८ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

ड) बिट मार्शल नेमून शाळागृहांजवळ तंबाखु जन्य पदार्थ विक्रीवर बंदी घालून सदर ठिकाणी असे व्यवसायीक आढळल्यास प्रथम वेळी ₹ ५ हजार दितीय्य वेळी ₹ १० हजार व तद्नंतरचे वेळी दुप्पट प्रशासकिय शल्कासह साठा जप्त करणे व इतर कठोर कार्यवाही केली जाणार असुन सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १ लक्ष व ₹ ५ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

इ) मैला सफाई :- महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी शौचकुपांच्या मैला सफाई साठी नाममात्र ₹ १००/- प्रति टँकर व महानगरपालिका क्षेत्रा बाहेर ₹ ७५०/- प्रति टँकर दराने दि.१/०४/२०१२ पासुन मैला सफाई फी वसुल केली जात आहे. यापासून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ५ लक्ष व ₹ ६ लक्ष ७५ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

इ) अस्वच्छता व उपद्रव, प्लॅस्टीक पिशव्या वापर यासाठी प्रशासकीय शुल्क, वसुलीद्वारे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ३ लक्ष ३ हजार व ₹ ५ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

ई) सुलभ शौचालय भाडे :- पैसे द्या आणि वापरा तत्वावर सुरु असलेल्या शौचालयांचा ठेका देण्यात आला असुन त्याद्वारे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये अनुक्रमे ₹ १ लक्ष ३९ हजार व ₹ १ लक्ष ५८ हजार उत्पन्न अपेक्षित आहे.

स्वच्छता सेवेपासुन सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १२ कोटी ४० लक्ष २२ हजार व ₹ १५ कोटी ३१ लक्ष ९२ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

८) सर्वसाधारण नगररचना :- अ) सर्वसाधारण :- छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रिमियम, टिडीआर प्रिमियम, पुनवैधिकरण याबाबींपासून विकास आराखड्यातील सर्वसाधारण विकास विषयक कामांसाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ८७ कोटी ६३ लक्ष व ₹ ९१ कोटी ४२ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

ब) व्याज, संकिर्ण जमा, अनधिकृत बांधकाम नियंत्रण शुल्क या बाबींपासून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १२ कोटी ८ लक्ष व ₹ ११ कोटी २५ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

वरील प्रमाणे सर्वसाधारण प्रयोजनास्तव नगररचना विभागामार्फत सन २०१३-१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ९९ कोटी ७१ लक्ष व ₹ १०२ कोटी ६७ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

फायर कॅपिटेशन फी, नविन पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्क, याबाबींसाठीचे उत्पन्न अर्थसंकल्पात अन्यत्र नमुद केल्याप्रमाणे आहे. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे नगररचना विभागामार्फत सर्व लेखा लेखाशिर्षाखाली एकत्रितपणे अनुक्रमे ₹ १५१ कोटी ७१ लक्ष व ₹ १५९ कोटी ६७ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

९) सर्वसाधारण बांधकामे :- अ) प्राथमिक सोयी सुविधा अनुदान, रस्ता अनुदान, स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अर्थसहाय्य, रेल्वे उड्डाणपुलासाठी अनुदान, अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र विकास अनुदान, राजीव आवास योजना अनुदान, दलित वस्ती, वित्त आयोग, मत्स्य विकास महामंडळाकडून अनुदान, कत्तलखाना निर्मिती अनुदान या बाबींपासून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ६४ कोटी ९२ लक्ष १९ हजार व ₹ १४१ कोटी २० लक्ष इतके अनुदान अपेक्षित आहे.

ब) जे.सी.बी. व इतर वाहन भाडे, पाणी पुरवठा नळ जोडणी व्यतिरीक्त इतर कामांसाठी रस्ता खोदाई शुल्क, बांधकाम विभाग नाहरकत दाखला या बाबींपासून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ ८ कोटी २३ लक्ष ४० हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

बांधकाम विषयक बाबींसाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ७३ कोटी १५ लक्ष ५९ हजार व ₹ १४९ कोटी ४३ लक्ष ४० हजार इतके एकूण उत्पन्न अपेक्षित आहे.

१०) सांस्कृतिक भवन :- सांस्कृतिक भवन, वाचलालय, समाजमंदिर येथील हॉल भाडे तसेच सांस्कृतिक भवनामधे जनित्र वापरासाठीचे भाडे यापासून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १७ लक्ष ५० हजार व ₹ १९ लक्ष ५० हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

११) रुग्णालय व्यवस्था : सन २०१०-११ पासून सुरु झालेल्या आर.सी.एच.योजनेतंर्गत विविध ठिकाणी आरोग्य केंद्रांची सोय करण्यात येणार असुन महानगरपालिकेची पुर्वीची रुग्णालये /आरोग्य केंद्रे व नव्याने निर्माण केल्या जाणाऱ्या आरोग्य केंद्रामधे बाह्य रुग्णविभाग व अंतर रुग्णविभागामधील नोंदणी, औषधे, ऑपरेशन, उपचार व इतर सेवा यापासून मिळणारे उत्पन्न तसेच रुग्णवाहिका व शववाहिनी भाडे इत्यादी बाबींपासून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १ कोटी व ₹ १ कोटी ६ लक्ष ८१ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

१२) वाचनालय व्यवस्था :- महानगरपालिकेच्या विविध वाचनालयातील अधिकतम दरानुसार समान दराने सर्वत्र फी अनामत रक्कमा वसुल करण्याचा प्रस्ताव आहे. वाचनालय फी, वाचनालय प्रवेश फी, अनुदान, हरविलेल्या पुस्तकांची किमंत, रद्दी विक्री, अभ्यासिका प्रवेश फी, इंटरनेट सेवा इत्यादी बाबींपासून सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ २० लक्ष ६८ हजार व ₹ १५ लक्ष ८४ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे .

१३) तलाव व्यवस्था : एकात्मिक तलाव संवर्धन योजनेअंतर्गत सन २०१३-१४ मधे ₹ १७ कोटी ५० लक्ष व २०१४-१५ मधे ₹ १७ कोटी ५० लक्ष इतके अनुदान प्राप्त होणार असून मत्स्योत्पादन आणि नौकाविहार यासाठी तलाव लिलाव व तरणतलाव उत्पन्न इत्यादी बाबीपासून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १ कोटी ६ लक्ष ८४ हजार व ₹ १ कोटी ८ लक्ष ४६ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

१४) सर्वसाधारण अनुदाने : - जमिन महसुल व बिनशेती सारा अनुदान, करमणूक कर अनुदान, मुद्रांक शुल्क अनुदान, अल्पबचत प्रोत्साहन अनुदान, प्राथमिक शिक्षण व्यवस्थेतील वेतन भत्या वरील अनुदान इत्यादी सर्वसाधारण प्रयोजनास्तव प्राप्त होणाऱ्या अनुदानांव्दारे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ १०६ कोटी ७४ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

वाचनालय, कत्तलखाना, कुटूंब कल्याण, जनगणना, आर्थिकगणना, पशुगणना, जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थापन महाअभियान योजना अनुदानासह बांधकाम विषयक बाबींसाठी प्राप्त अनुदाने, घनकचरा व्यवस्थापन, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना, अग्निशमन मिटीगेशन प्लॅन अनुदान, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अनुदान, सॅटेलाईट सिटी अनुदान या अन्यत्र नमुद अनुदानासह सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ २६० कोटी १८ लक्ष ७८ हजार व ₹ ११६ कोटी ५८ लक्ष ४५ हजार इतकी एकूण अनुदाने प्राप्त होणार आहेत.

१५) स्मशानभूमी व्यवस्था : महानगरपालिका क्षेत्रातील सर्व स्मशानभूमीमधे केल्या जाणाऱ्या मयत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी प्रेत दहन विधीकरीता मोफत लाकडे पुरविण्याचा निर्णय आहे. सबब सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे उत्पन्न अपेक्षित नाही.

१६) पर्यावरण संरक्षण : अ) वृक्ष कर :- महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ठ भुतपुर्व ग्रामपंचायत क्षेत्रातील २००९ पूर्वीच्या अस्तित्वातील मालमत्ता वगळता अन्य मालमत्तांसाठी १% दराने वृक्ष कर आकारणी केली जात असुन याद्वारे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १ कोटी ४९ लक्ष ५१ हजार व ₹ १ कोटी ५० लक्ष ७९ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

ब ) वृक्ष पुनःप्रत्यारोपण अनुदान : रस्ता रुंदीकरणात बाधित होणाऱ्या वृक्षाच्या पुनः प्रत्यारोपणासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सन २०१३-१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ ५ लक्ष अनुदान अपेक्षित आहे.

क) वृक्षतोड दंड इत्यादी बाबीपासून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ६५ हजार इतके उत्पन अपेक्षित आहे. अपरिहार्य परिस्थितीत वृक्ष तोडीस परवानगी देताना संबंधीत परवानगी घेणाऱ्या व्यक्ती संस्थेकडे वृक्षारोपणासाठी जागा उपलब्ध नसल्यास प्रती वृक्षासाठी रु. २५००/- प्रमाणे फी वसुल करुन अन्य व्यक्ती संस्थेस वृक्षारोपण व संगोपन करणेकामी प्रतीवर्षी ₹ ५००/- प्रमाणे अदा करुन वृक्षारोपण करुन घेणेचा प्रस्ताव आहे. यामुळे वृक्षारोपण व संवर्धनाचा हेतु तसेच गरीब गरजुंना मदत या दोन्ही गोष्टी साध्य होतील.

पर्यावरण संरक्षणासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १ कोटी ५८ लक्ष २० हजार व ₹ १ कोटी ६० लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

१७) पाणीपुरवठा :-अ) पाणीपट्टी :-पाणी पुरवठा व विशेष पाणीपट्टी उपविधी २०११ संदर्भाने महानगरपालिकेच्या निर्णयानुसार उपविधी मंजुरीच्या लगतपुर्वी त्या त्या क्षेत्रात असलेल्या पुर्वीच्या दरानेच सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे विशेष पाणीपट्टी /सर्वसाधारण पाणीपट्टी लागू असुन सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ३९ कोटी ८२ लक्ष ८८ हजार व ४३ कोटी ४५ लक्ष ६३ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

ब) पाणी पुरवठा नळ जोडणी फी , फॉर्म फी, हस्तांतरण फी, स्थलांतर फी, रस्ता खोदाई शुल्क याबाबत महानगरपालिका स्तरावर सर्वत्र प्रचलीत अधिकतम असलेल्या समान दराने आकारणीचा निर्णय आहे. याव्दारे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ २३ लक्ष ८ हजार व ₹ २१ लक्ष ९० हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

क) नळ जोडणी आकार / विकास योजने अंतर्गत पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्क :- पाण्याचा वापर करण्याऱ्या भविष्यकालीन लाभार्थ्यांचा योजना खर्चात सहभाग आवशक असून नविन योजना खर्चाचा भांडवली भाराचा वाढीव बोजा सद्याच्या लाभार्थ्यांवर पडू नये म्हणून पाणी पुरवठा व विशेष पाणीपट्टी उपविधी २०११ संदर्भाने महानगरपालिकेच्या निर्णयानुसार उपविधीतील प्रस्तावित दराने आकारणी केली जात असून याव्दारे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ३५ कोटी व ₹ ४० कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

ड) पाणीपुरवठा योजनेसाठी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजनेतंर्गत सुर्या विस्तारित १०० द.ल.ली. पाणीपुरवठा योजना वितरण व्यवस्थेसाठी सन २०१३-१४ मध्ये ₹ ५४ कोटी व सन २०१४-१५ मध्ये ₹ ८१ कोटी अनुदान अपेक्षित आहे. याव्यतिरीक्त ९५८ कोटीच्या पाणीपुरवठा योजनेसाठी यु. आय. डी. एस. एस. टी /यु. आय. डी. एस. एस. एम. टी. योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यातील ₹ २३९.५० कोटी खर्चापैकी अनुज्ञेय अनुदान ₹ २१५ कोटी ५५ लक्ष अन्यत्र नमुदप्रमाणे प्राप्त होणार आहे.

इ) अनधिकृत मालमत्तांसाठी नळ जोडणी शास्ती :- महानगरपालिकेस अनधिकृत मालमत्तांना देखिल पाणीपुरवठा करावा लागतो. अधिकृत मालमत्तांबाबत नगररचनामार्फत शुल्क वसुल केले जाते, मात्र अनधिकृत मालमत्तांबाबत नियमीत शुल्क वसुल केले जात नसल्याने नव्याने निर्माण होणाऱ्या अनधिकृत बांधकामांना आळा घालणे व नव्याने निर्माण होणाऱ्या अनधिकृत मालमत्तांचा वापर करणे पासुन लोकांना परावृत्त करणेसाठी नव्याने दिल्या जाणाऱ्या अनधिकृत मालमत्तांच्या नळ जोडणीसाठी मालमत्ता करावरील शास्ती प्रमाणे पाणी पट्टी व नळ जोडणी संबंधीचे सर्व शुल्कांच्या दुप्पट दराने शास्ती वसुल केली जाणार आहे.

पाणी पुरवठा सेवेसाठी सन २०१३-१४ मध्ये ₹ १२९ कोटी १४ लक्ष २ हजार व सन २०१४-१५ मधे ₹ १६४ कोटी ७६ लक्ष ६१ हजार (यु. आय. डी. एस. एस. टी / यु. आय. डी. एस. एस. एम. टी. योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यातील ₹ २३९.५० कोटी खर्चापैकी अनुज्ञेय अनुदान ₹ २१५ कोटी ५५ लक्ष व्यतिरीक्त) इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

१८) कर्ज निधी :- पाणी पुरवठा, रिंगरोड व इतर योजनांसाठी ₹ २६०६ कोटी इतके कर्ज अपेक्षित असून सन २०१४-१५ मध्ये प्रथम टप्पात ₹ ३७५ कोटी कर्ज उपलब्ध करणेची तरतुद आहे. वाढीव कर्ज प्रत्यक्ष प्राप्तीनंतर अतिरीक्त तरतुदीव्दारे जमा खर्च दर्शवणेचे प्रस्तावित आहे.

१९) सॅटेलाईट सिटी योजना अनुदान :- सद्याची सॅटेलाईट सिटी योजना व भविष्यात त्याऐवजी लागू होणारी अन्य योजना (यु. आय. डी. एस. एस. टी. / यु. आय. डी. एस. एस. एम. टी) अंतर्गत भुयारी गटर योजना, पाणीपुरवठा योजना, घनकचरा व्यवस्थापन यासाठी योजनेच्या प्रारंभापासुन नोव्हेंबर २०१३ अखेर पर्यंत एकुण ₹ २२ कोटी ३ लक्ष ९३ हजार अनुदान प्राप्त झाले असुन मार्च २०१४ अखेर पर्यंत ₹ २२ कोटी ३ लक्ष ९३ हजार व सन २०१४-१५ मध्ये ₹ ५८० कोटी ४० लक्ष ५५ हजार अनुदान अपेक्षित आहे.

२०) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजना :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत पाणीपुरवठ्यासाठी सुर्या विस्तारित १०० द.ल.ली. पाणीपुरवठा योजना वितरण व्यवस्थेसाठी सन २०१३-१४ मध्ये ₹ ५४ कोटी व सन २०१४-१५ मध्ये ₹ ८१ कोटी अनुदान मंजुर झाले असुन प्राप्त होणार आहे.

२१) जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थापन महाअभियान योजना:- या योजनेअंतर्गत मोनोरेलसह रिंगरोड व्यवस्थेसाठी ₹ ७५ कोटी अनुदान अपेक्षित आहे.

## ❖ ठळक खर्च बाबी ❖

१) आस्थापना खर्च :-

महानगरपालिका आस्थापनेवरील सर्व कर्मचाऱ्याना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार पुर्वलक्षी प्रभावासह वेतनश्रेणी लागू केल्या आहेत. ६ व्या वेतन आयोगानुसार देय फरकाची परिगणना सुरु आहे. जानेवारी २०१४ अखेर रक्कम निश्चित होणार असुन सुधारीत अंदाजपत्रकात तद्नुसार वाढीव रक्कम मंजुर होणेस शिफारस आहे. अग्निशमन व स्थानिक संस्था कर विभागासाठी नविन पदे निर्माण करुन भरती करणे, रोंजदारी तत्वावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेणे, संगणक प्रणाली/आज्ञावली विकसीत करणे, झेरॉक्स मशिन खरेदी, फर्निचर खरेदी अंतर्गत कॉपी प्रिंटर खरेदी, इ-गव्हर्नन्स अंमलबजावणी, कार्यालयीन कामाचे आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळवणे, महानगरपालिकेची वेबसाईट तयार करणे, वाळवी प्रतिबंधक किटकनाशक औषधे फवारणी करणे, संगणकीय पध्दतीने अभिलेख व्यवस्थापन करणे, अधिकारी निवासस्थान दुरुस्ती, भुसंपादन करुन सभागृह व पत्रकार भवनासह नगरभवन इमारत बांधकाम, प्रशासकीय इमारत बांधकाम व नुतनीकरण, आयुक्त निवास, महापौर निवास, ध्वनी प्रक्षेपण यंत्रणा, प्रोजेक्टर खरेदी, सफाई कामगारांसाठी निवासस्थान बांधकाम, पारगमन /ट्रांझीट फी वसुलीवर प्रभावी नियंत्रण राहण्यासाठी सीसी टिव्ही कॅमेरे, बिनतारी संदेश यंत्रणा, छोटया मोठया तिजोऱ्या, जप्त मालमत्ता संरक्षणासाठी भांडार गृह याबाबींसाठी सन २०१३-१४-१५ मधे पुरेशा तदतुदी आहेत.

| लेखाशिर्ष | तरतूद | |
|---|---|---|
| | सन २०१३-१४ | सन २०१४-१५ |
| स्थायी आस्थापना वेतन व भत्ते | ₹ ३२ कोटी ६३ लक्ष ४३ हजार | ₹ ४३ कोटी ८६ लक्ष ६१ हजार |
| रोजंदारी आस्थापना वेतन व भत्ते | ₹ १२ लक्ष ३० हजार | ₹ १२ लक्ष ४० हजार |
| रस्तावरील कचरा व इतर साफसफाई व्यतिरीक्त विविध कामकाजाच्या व्यवस्थापनासाठी कर्मचारी पुरवणेचा ठेका | ₹ ४० कोटी ४१ लक्ष ८० हजार | ₹ ४३ कोटी १२ लक्ष २६ हजार |
| कर्मचाऱ्यांसाठीचे इतर लाभ | ₹ ८ कोटी २९ लक्ष १ हजार | ₹ ८ कोटी ९ लक्ष १० हजार |
| इतर प्रशासकीय खर्च | ₹ २२ कोटी ७२ लक्ष | ₹ २७ कोटी ९१ लक्ष ४१ हजार |
| महानगरपालिका सदस्यांसाठीचा खर्च | ₹ १ कोटी ९० लक्ष ३५ हजार | ₹ १ कोटी ९२ लक्ष ४० हजार |
| एकूण | ₹ १०६ कोटी ८ लक्ष ९० हजार | ₹ १२५ कोटी ४ लक्ष १८ हजार |

महानगरपालिका आस्थापनेवर सद्यस्थितीत १२०८ कर्मचारी कायम स्वरुपी सेवा, ठोक वेतन सेवा, रोजंदारी सेवा स्वरुपात कार्यरत असुन महानगरपालिकेच्या विस्तीर्ण कार्यकक्षेचा विचार करता आवश्यक सुविधा पुरवणेसाठी झोन निहाय साफसफाई ठेक्याव्यतिरीक्त प्रशासकीय, तांत्रिक, नियोजन, विकास, अग्निशमन, पाणीपुरवठा, आरोग्य, वैद्यकिय आरोग्य, दिवाबत्ती, वाचनालय, शिक्षण, कर वसुली, आर्थिक इ. जवळपास सर्व कामकाजाचे व्यवस्थापनासाठी कर्मचारी वैयक्तीक कंत्राट अथवा अभिकरणामार्फत नियुक्त केले गेले आहेत. यासाठी महानगरपालिकेस सन २०१४-१५ मध्ये ₹ ४३ कोटी १२ लक्ष २६ हजार इतका खर्च अपेक्षित आहे. विविध कर्तव्ये व जबाबदाऱ्या अधिकारासह सोपवणेत आलेल्या आहेत. संस्था व कर्मचारी यामधे सौदार्हपुर्ण विश्वासाचे व परस्पर निष्ठेचे संबंध प्रस्थापित करणेसाठी व कर्मचाऱ्यामधे भविष्यातील नोकरीच्या सुरक्षिततेची भावना निर्माण करणेसाठी शक्य त्या विभागांमधे कायम स्वरुपी पदे निर्माण करणेचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सर्व कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदा व इतर तत्सम कामगार कायद्याचा विचार करुन सेवा लाभ द्यावे लागत असल्याने ठेका कर्मचाऱ्यांसाठी येणाऱ्या खर्चातून कायम स्वरुपी आस्थापनेचा खर्च भागविणे कामी पुन:विनियोजन करणे शक्य होणार आहे. सद्यास्थितीत सदरचा खर्च विभागनिहाय ठेका आस्थापना शिर्षांतर्गत दर्शविण्यात आलेला आहे.

२) सर्वसाधारण नगररचना :- जी.आय.एस.मॅपींग/लॅण्ड युज अपडेशन, ऑटो डी.सी.आर, स्टॉर्म वॅाटर ड्रेनेज मास्टर प्लान, सि.आर.झेड. सर्व्हे, आकस्मिक खर्च इत्यादी बाबींसाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ३ कोटी ७५ लक्ष व ₹ ५ कोटी ६० लक्ष इतकी तरतूद आहे.

३) दिवाबत्ती व्यवस्था :- शहरातील पथदिप व्यवस्थापन, अपारंपारीक ऊर्जास्त्रोत निर्मिती, उव्दाहन दुरुस्ती, विद्युत देयक, विद्युत मंडळाचे चार्जेस, पोल स्थलांतर, नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था/ टायमर व्यवस्था, रोहित्र खरेदी, दिवाबत्ती विभागासाठी वाहन खरेदी इत्यादी खर्चासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ २५ कोटी ८५ लक्ष व ₹ ४२ कोटी ५० लक्ष ३० हजार इतकी तरतूद आहे. सद्याचे दिवे आवश्यकतेनुसार बदलून एल ई डी व्यवस्था अंमलात आणण्याचा प्रस्ताव असून यामुळे भविष्यातील महसुली खर्चात २८ ते ३०% खर्च कपात अपेक्षित आहे.

४) कोंडवाडा व श्वान निर्बिजीकरण :- मोकाट आणि पिसाळलेल्या जनावरांचा बंदोबस्त, मादी श्वान निर्बिजीकरण शेड बांधकामासह मोकाट मादी श्वानांचे निर्बिजिकरण, कोंडवाडयातील जनावरांसाठी पशु खाद्य, पशु वैद्यकीय सेवा, पेल्हार डॅम जवळ कोंडवाडयासाठी सर्व्हेक्षण, आरक्षण करुन कोंडवाडा बांधकाम इत्यादी कामासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ५३ लक्ष २५ हजार व ₹ १ कोटी ८ लक्ष २५ हजार इतकी तरतूद आहे.

५) अग्निशमन व्यवस्था : अत्याधुनिक अग्निशमन यंत्रणा उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु असून त्यासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ६ कोटी ३९ लक्ष १३ हजार व ₹ ८ कोटी ६७ हजार इतकी तरतूद आहे. भविष्यकालीन योजनांसाठी ₹ २२ कोटी ८३ लक्ष इतका निधी मार्च २०१५ अखेर शिल्लक रहाणे अपेक्षित आहे.

६) फिरते स्वच्छता गृह :- यात्रा, बाजार व सांस्कृतीक कार्यक्रमाचे ठिकाणी फिरते स्वच्छता गृह उपलब्ध करुन दिले जाणार आहे. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे फिरते स्वच्छता गृह भाड्याने घेणे कामी अनुक्रमे ₹ १ लक्ष व ₹ ५ लक्ष इतकी तरतुद अपेक्षित आहे.

७) रस्त्यावरील केरकचरा व इतर साफसफाई :-

गोखिवरे येथे खाजगी तत्वावर सुमारे ₹ ३०/- कोटी खर्च करुन १९.५ हेक्टर जमिनीवर घनकचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्याचा प्रकल्प पुर्णत्वास आलेला आहे. तथापी क्षमतावृध्दी व सुधारणा कार्यवाही सातत्याने सुरु आहे. सदरच्या परिसरात दुर्गंधी पसरु नये किंबहुना सदर परिसर शहरातील सर्वात स्वच्छ व सुंदर परिसर असेल या दृष्टीने रस्ता, गटर, पाणीपुरवठा, दिवाबत्ती, वनीकरण, इत्यादी व्यवस्था करण्याचा प्रस्ताव आहे. महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागासाठी तद्वतच शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी

उपलब्ध करुन द्यावयाच्या खतासाठी सदर ठिकाणचे खत उपलब्ध करुन दिले जाणार असुन विविध औद्योगिक उपक्रमांनी या ठिकाणी निर्मीत केले जाणारे उत्पादन वापरणेसाठी उद्युक्त करणेस विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. ज्यायोगे प्रकल्प कार्यान्वीत रहाणेस सहाय्य होईल.

डंपिंग ग्राऊड व्यवस्था, सॅनीटरी लँडफील व्दारे कचऱ्याची विल्हेवाट, धुर फवारणी मशिन खरेदी, स्प्रे पंप मशिन खरेदी, मालमत्तांच्या व्हेंट पाईपवर जाळी बसवणे यासह स्वच्छता विभागास आवशक सर्व इतर खर्चासाठी तरतूदी उपलब्ध आहेत.

सद्यस्थितीत सदर कामी येणारा खर्च हा सन २०१३-१४ च्या सुधारीत निविदांच्या आधारे गृहित धरला आहे. एप्रिल २०१४ पासून साफसफाई ठेक्याच्या स्वरुपात बदल करुन कचरा उचलण्याच्या प्रमाणानुसार ठेका देण्याचे प्रस्तावित असून यामुळे खर्चात मोठया प्रमाणात बचत अपेक्षित असून शुन्य कचरा अभियान राबवणे शक्य होणार आहे. सॅटेलाईट सिटी योजनेंतर्गत प्राप्त अनुदान निधीतून प्रभावी कॉम्पॅक्टर व इतर कचरा वाहतूक वहाने उपलब्ध झाली असुन ती याकामी संबंधीत ठेकेदारास उपलब्ध करुन दिली असल्याने याबाबतचा खर्च समायोजित होण्यास मदत झाली आहे. नारिंगी येथे क्षेपणभूमी मधे विरार व नजीकच्या परिसरातील कचऱ्याची विल्हेवाट बी.ओ.टी. तत्वावर लावणे कामी १०० टन कचऱ्यावर प्रक्रिया करुन वीज निर्मिती करण्याचा प्रस्ताव आहे. याव्यतिरीक्त प्रभागनिहाय पुरेसे छोटे युनिट बसविण्याची तरतुद घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत आहे. यामुळे कचरा वाहतूक खर्चात देखिल बचत होणार आहे.

रस्त्यावरील केरकचरा व इतर साफसफाई करिता सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे **₹** ७९ कोटी ३ लक्ष ६७ हजार व **₹** ९८ कोटी ९१ लक्ष ८९ हजार इतका एकूण खर्च अपेक्षित आहे.

८) रुग्णालय व्यवस्था :- वसई येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयासह संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी या क्षेत्रावर अधिक भर देण्यात आला असून तद्नुसार वाढीव तरतुदी प्रस्तावित आहेत. मा. लोकनेते श्री हितेंद्रजी ठाकूर यांनी विशेष प्रयत्नाने मिळवून दिलेल्या विशेष निधीतून नालासोपारा येथे महानगरपालिकेच्या रुग्णालयाचे काम पुर्णत्वास आले असुन लवकरच कार्यान्वीत होणार आहे याशिवाय तालुक्याच्या मध्यवर्ती ठिकाणी २०० बेडचे अद्यावत रुग्णालय उघडण्याचा प्रस्ताव आहे. जिल्हा परिषद आरोग्य विभागाची प्राथमिक आरोग्य केंद्रे ताब्यात घेऊन अद्यावत करुन त्या व्दारे आरोग्य सेवा देण्याचा प्रस्ताव आहे. सद्यस्थितीत रुग्णालय व निदान

केंद्रासह प्रभाग पातळीवर विविध ठिकाणी आरोग्य केंद्रे आहेत. महानगरपालिकेंसाठी अनुज्ञेय आर.सी.एच. योजनेअंतर्गत विविध नविन केंद्रे उपलब्ध झाली आहेत. नालासोपारा येथील रुग्णालय सूरू करुन यामध्ये अत्याधुनिक उच्च दर्जाच्या वैद्यकिय सेवा व उपचार पुरविले जाणार असुन रुग्णालयातील बालकांचे संरक्षण व ओळख यासाठी क्लोज सर्किट कॅमेरा व्यवस्थापन/बायोमेट्रिक आयडेंन्टीफिकेशन व्यवस्थापन, इत्यादी कामी आवशक त्या तरतूदी अर्थसंकल्पात आहेत. रुग्णालयीन साहित्य, रुग्णालय व परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणेसाठी विशेष दक्षता घेतली जाणार आहे. रुग्णालयीन औषधे व उपकरणे उच्च दर्जाची सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देणेसाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जाणार आहेत. रुग्णालयीन अधिकारी व कर्मचारी यांचे वर्तन रुग्ण व त्यांचे नातेवाईकांप्रती उत्तम असावे यासाठी रुग्णालय, आरोग्य केंद्र इ. मधील अधिकारी व कर्मचारी कायम स्वरुपी सेवेत समाविष्ट करुन घेणेची आवश्यकता विचारात घेऊन तद्नुसार प्रयत्न केले जाणार आहेत. रुग्णालय व्यवस्थापनासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे **₹** २८ कोटी ४७ लक्ष ९५ हजार व **₹** ३० कोटी ८३ लक्ष ३५ हजार इतकी तरतूद उपलब्ध आहे.

९) आपत्कालीन व्यवस्था :- आपत्कालीन परिस्थितीत गरीब गरजूंना अर्थसहाय्य करणे तसेच आपत्कालीन कालावधीत विशेष सेवा पुरविणेसाठी उपाय योजना करणे महानगरपालिकेची जबाबदारी आहे. आपत्कालीन परिस्थितीत तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करणेसाठी ट्रांझीट कॅम्प व अग्निशमन अनुदानांतर्गत आपत्ती निवारण केंद्र उभारणे, आपत्कालीन परिस्थिती नियंत्रणासाठी पोलिस मदतीसह हेलिकॅप्टर भाडे व इतर आपत्कालीन व्यवस्थेसाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे **₹** १ कोटी ११ लक्ष व ₹ १ कोटी ३६ लक्ष इतकी तरतूद आहे. सदर तरतुद आवश्यक भासल्यास वाढवणे अनुज्ञेय आहे.

महापौर सहाय्यता निधी : महानगरपालिका निधीतून गरीब गरजूंना आर्थिक मदत करताना विशेष बंधनाशिवाय आर्थिक सहाय्य देता यावे हा या निधीचा प्रमुख उद्देश आहे. तसेच दुदैवाने उद्भणाऱ्या आपत्कालीन स्थितीत अन्य देश बांधवाना सहाय्य करण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून विशेष प्रयोजनासाठी आवाहन करुन स्थानिक ठिकाणी रक्कम जमा करणे व मुदतीत संबंधीताना मदत करणे यासाठी देखिल या निधीचा उपयोग होणार आहे. सामाजिक बांधीलकी जोपासणाऱ्या या निधीसाठी नागरिकांनी आपल्या बचतीतील काही अंशी हिस्सा जमा केल्यास आपत्कालीन स्थितीत स्थानिक क्षेत्रातील आपल्या बंधू भगिनींना भरीव आर्थिक मदत वेळीच उपलब्ध होईल. महापौर सहाय्यता निधी ट्रस्टची धर्मादाय आयुक्त यांचे कडे नोंदणी करण्यात आली आहे. यामुळे विविध दानशुर व्यक्तींना प्राप्तीकर कायद्यानुसार अनुज्ञेय सवलत मिळून अधिक-अधिक निधी उपलब्ध होऊ शकेल याशिवाय महापौर सहाय्यता निधीसाठी महानगरपालिका निधीतून संस्था अनुदाने या शिर्षाअंतर्गत आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव आहे.

१०) सर्व धर्मीयांसाठी दहन व दफनभूमी व्यवस्था :- अ) दहन व दफन भुमीच्या व्यवस्थेसाठी महसुली खर्चाकरीता सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १ कोटी ८६ लक्ष १० हजार व ₹ २ कोटी ६ लक्ष ३५ हजार तरतूद आहे

ब) सर्व धर्मीयांसाठी दफनभूमी विकास :- महानगरपालिका क्षेत्रातील दहन भुमींमध्ये महानगरपालिका लगतचे क्षेत्रातील व्यक्तींचेदेखील अंत्यसंस्कार केले जात असुन अशा सर्व अंत्यसंस्कारासाठीदेखील प्रेत दहनाकरीता लाकडे मोफत उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. दहन भूमीचा इतर नागरिकांना होणारा त्रास विचारात घेऊन दहन भूमीचे सुशोभिकरण करणे, सदर ठिकाणी उद्यान कारंजे, वाचनालय इत्यादी सुविधा उपलब्ध करणे, पुरेशा उंच संरक्षक भिंतीची व्यवस्था करणे, सर्व धर्मीयांसाठी भुसंपादनासह दफनभूमी विकसित करणे तसेच उपलब्ध दफन भूमींच्या विकास व सौदर्यीकरण इत्यादी साठी बांधकाम विभागांतर्गत सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ९ कोटी ७९ लक्ष व ₹ २० कोटी इतकी तरतूद आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख दहनभुमींचे ठिकाणी विद्युत व गॅस दाहिनी व्यवस्था मोफत उपलब्ध करुन देऊन पर्यावरण संरक्षण करणेसाठी प्रयत्न केले जात असुन विद्युत दाहिनी व गॅस दाहिनीचा वापर करणेस प्रवृत्त करणेस प्रत्येक अंत्यसंस्कारासाठी प्रारंभ काळात मयत व्यक्तीचे निकटतम् गरीब गरजू नातेवाईकास ठोक ₹ १ हजार अर्थसहाय्य अंत्यसंस्काराच्या वेळी अथवा अतिशिघ्र घरपोच देणेचा प्रस्ताव आहे. तथापि नजीकच्या भविष्यात मात्र गॅस दाहिनी किंवा विद्युत दाहिनी उपलब्ध असलेल्या ठिकाणी अंत्यसंस्कारासाठी लाकडे उपलब्ध करुन देणेस आग्रही असणाऱ्या मयत व्यक्तिचे नातेवाईकास लाकडे सशुल्क उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

वरीलप्रमाणे दहन दफनभूमीच्या एकूण व्यवस्थेसाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ११ कोटी ६५ लक्ष १० हजार व ₹ २२ कोटी ६ लक्ष ३५ हजार इतकी एकूण तरतूद उपलब्ध आहे. आवश्यकतेनुसार अतिरीक्त अर्थसंकल्पाव्दारे व पुन:विनियोजनाव्दारे वाढीव तरतुद देखिल उपलब्ध होऊ शकेल.

११) उद्यान व्यवस्था :- महानगरपालिका क्षेत्रातील विविध उपलब्ध ठिकाणी अबाल वृध्दांसाठी बालोद्यान, सर्वसाधारण उद्यान, विज्ञान उद्यान, वनस्पती उद्यान, जॉर्गस पार्क इत्यादी विकसित करण्याचा संकल्प असून उद्यानामधे खेळणी, क्रिडा साहित्य, म्युझीकल सिस्टींम, इलेक्ट्रीक फिटींग, बैठक व्यवस्थेसाठी बाकडे, उद्यानामधे कारंजे व्यवस्था इत्यादी विविध उद्यान विषयक बाबींसाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ४ कोटी १८ लक्ष ३८ हजार व ₹ ६ कोटी १ लक्ष ५० हजार इतकी तरतूद उपलब्ध आहे. उद्यानावरील

महसूली खर्च,  व सदर क्षेत्र जाहिरातीसाठी उपलब्ध करुन देता येण्याची शक्यता विचारात घेऊन  सर्व उद्याने  दुरुस्ती  देखभालीच्या  जबाबदारीसह  जाहिरातीसाठी  ठेकापध्दतीने देणेस शिफारस आहे. ज्यायोगे खर्चात बचत होऊन उत्पन्न स्त्रोत निर्माण होईल.

१२) सांस्कृतिक भवन व्यवस्था :-  सांस्कृतिक भवन व समाजमंदिर व्यवस्थेसाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५  मधे अनुक्रमे ₹ २८ लक्ष ३७ हजार व ₹ ७८ लक्ष ९० हजार इतकी तरतूद आहे.

१३) मार्केट व्यवस्था :- लोकनेते मा. श्री . हितेंद्रजी ठाकूर यांच्या विशेष पाठपुराव्याने मत्स्य विकास महामंडळाकडून प्राप्त अनुदानातून निर्माण होत असलेल्या मार्केटसह शहरात विविध ठिकाणी शितगृहाच्या व्यवस्थेसह ओले मासळी मार्केट, मटन मार्केट, सुकी मासळी मार्केट, भाजी मार्केट, फुल मार्केट, इत्यादी मार्केट व बहुउद्देशिय मंडईच्या विकासासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ २ कोटी ११ लक्ष १५ हजार व ₹ ३ कोटी २७ लक्ष ५५ हजार इतकी तरतूद आहे.

१४) तलाव व्यवस्था :- विरार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तलाव, ॲड. सि. पी. सोलंकी परिक्रमा व नौकाविहार केंद्र तसेच नालासोपारा येथील चक्रेश्वर तलाव, आचोळा तलाव विकसित करण्यात आलेला असून या धर्तीवर एकात्मिक तलाव संवर्धन योजनेंतर्गत प्राप्त अनुदानातून निर्मळ येथील विमल तलावासह चेन ऑफ लेक नुसार पापडी तलाव, तामतलाव इ. शहरातील विविध तलावांचे पुनर्जिवीतीकरण व सुशोभिकरण करणे, छट पुजेच्या व्यवस्थेसह सर्व धर्मियांच्या देवदेवतांच्या मुर्तीच्या विसर्जनाची व्यवस्था करणे, निर्माल्य कलश व्यवस्था करणे इत्यादी कामी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ २० कोटी ८३ लक्ष १६ हजार व ₹ ५१ कोटी ७८ लक्ष ४५ हजार इतकी तरतूद आहे.

१५) परिवहन व्यवस्था :- वस्ती तेथे बस सेवा या संकल्प पुर्तीसाठी महानगरपालिका वचनबध्द असुन त्या दृष्टीने परिवहन सेवा यशस्वीपणे सुरु झाली आहे. जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थापन महाअभियान योजनेअंतर्गत ३४६ बसेस उपलब्ध होणार असुन परिवहन सेवेसाठी ₹ १४४ कोटी २५ लक्ष अनुदान प्राप्त होणार आहे. सन २०१४-१५ मध्ये वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांसाठी परिवहन सेवेअंतर्गत अधिक अधिक सुविधा माफक दरात देण्याचा प्रस्ताव आहे. महानगरपालिका निधीतुन ब अंदाजपत्रकाकडे ₹ ५९ कोटी ९७ लक्ष इतकी रक्कम वर्ग करणेची तरतुद आहे.

१६) बांधकाम व्यवस्था :- बांधकामाच्या महसुली खर्च विषयक बाबी, दुरुस्ती विषयक बाबी, नविन कामे इत्यादी साठी आवशक अर्थसंकल्पीय तरतूदी आहेत. इमारत दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती, इतर बांधकामांची दुरुस्ती देखभाल, रस्ते सौदर्यीकरण, कॅटआय रिफ्लेक्टर व्यवस्था, सिग्नल व्यवस्था, कामगार निवास दुरुस्ती, विशेष तांत्रिक कामांसाठी तांत्रिक सल्लागारामार्फत बांधकामाचे नियोजन व अंदाजपत्रक तयार करुन नियंत्रण ठेवणे, भुमापन खर्च, संरक्षक भिंत बांधकाम दुरुस्ती, हुतात्मा स्मारके व ऐतिहासिक स्मारक देखभाल, धोबीघाट, विकास कामांच्या कर्ज परतफेडीची तरतूद, रोडरोलर व बांधकाम विषयक वाहन खरेदी, दहन तसेच दफनभूमी व क्रिडागंणे या व्यतिरिक्त इतर नागरी सुविधांसाठी भुसंपादन, कला, संगित व नाट्यक्षेत्रासाठी नवघर माणिकपूर व नालासोपारा येथील नाटयगृह बंदिस्त करुन नुतनीकरण करणेसह इतर ठिकाणी खुली व बंदिस्त नाटयगृह व व्यायामशाळा उपलब्ध करणे, सभागृह बांधकाम, पुढील पाच वर्षाच्या दुरुस्ती देखभालीच्या जबाबदारीसह विविध ठिकाणी सिमेंटचे रस्ते, डांबरी रस्ते व नविन रस्त्यांसाठी खडीकरण तसेच पदपथ व्यवस्था, गटार बांधकाम, भुमिगत गटार व्यवस्था, नाला व मोरी बांधकामे, गटारावर चेंबर्स व्यवस्था सार्वजनिक शौचालय व मुतारी बांधकामे, नालासोपारा येथील बौध्द स्तुपासह इतर ऐतिहासिक मालमत्ता मुल्यवर्धी योजना, भुसंपादीत आरक्षित जागांचा विकास, प्रवाशांसाठी रात्र निवारा गृह उपलब्ध करणे, इतर विकास कामे, शहरविकास प्रकल्प आराखडा तयार करणे, महत्वाच्या ठिकाणी दिशादर्शक फलक व स्वागत कमानी, अल्पसंख्याक बहुल क्षेत्र विकासकामे, महापौर निधी अंतर्गत त्यांचे शिफारशी नुसार व प्रभाग समिती स्तरावर प्रभाग समिती निधीतील आवशक कामे, वैशिष्टपूर्ण कामे व मुलभूत सुविधा विषयक कामांसाठी प्राप्त विशेष निधीतील कामे, गोव्याच्या धर्तीवर महानगरपालिका क्षेत्रातील समुद्र किनारी हायटाईडपासून १ कि.मी. अंतरावर मेरीटाईम बोर्डाच्या मार्गदर्शन व सहकार्यानुसार चौपाटी विकासकरुन चौपाटीच्या ठिकाणी धार्मिक विधींसाठी सुविधा पुरविणे, मारंबळपाडा - वसई - भाईंदर अशी जीवसंरक्षक व्यवस्थेसह फेरीबोट सेवा, मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर खाजगी लोक सहभागातून पोर्टची स्थापना करणे यासह मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर यांच्या विनंतीनुसार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत विधान सभेचे उपसभापती मा.ना.श्री. वसंतरावजी डावखरे सो. यांचे निधीतील त्यांचे सुचनेनुसारची कामे, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर यांच्या निधीतील कामे बंदर विकास कामांतर्गत मच्छीमार / कोळी बांधवांसाठी व्यवसाय वृद्धीकरिता शितगृह व्यवस्था, बर्फ कारखाना, मासळी सुकवण्यासाठी चौथरा बांधकाम, जेट्टीच्या जोडरस्त्याचे कॉक्रिटीकरण, उतरता धक्का बांधणे, खारफुटीची जागा संरक्षित करणे, धुप प्रतिबंधक बंधारे व समुद्र किनारी संरक्षक भिंती उभारणे, मासेमारी नौकांचे यांत्रिकीकरण करणे इत्यादी विविध विकासकामांसाठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे **₹** ३४६ कोटी २७ लक्ष ५८ हजार व **₹** ५३० कोटी ६७ लक्ष ८० हजार इतकी तरतूद आहे.

१७) मोनोरेलसह रिंगरोड :- शहरांतर्गत रहदारीतील अडथळे दूर करुन ध्वनी प्रदुषण व वायु प्रदुषण टाळणे, डिझेल, पेट्रोल, गॅस इत्यादी उर्जेची बचत करणे. उच्च प्रतिचे रस्ते दळणवळणासाठी उपलब्ध करणे करीता ₹ ८०० कोटी गुंतवणूक असलेला रिंगरोड प्रकल्प साकारण्याची संकल्पना मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर यांनी मांडली असून त्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अनुदान अथवा महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजनाअंतर्गत अनुदान प्राप्त करणेचा प्रयत्न केला जात असून जरूर तर वित्तीय संस्थाकडून कर्ज उभारणी केली जाणार आहे. महानगरपालिकेचा स्वत:चा हिस्सा व कर्ज परतफेडीसाठी द्याव्या लागणाऱ्या अंशदानासाठी सन २०१३-१४ साठी ₹ ५५ लक्ष व सन २०१४-१५ करीता ₹ १९४ कोटी ७९ लक्ष इतक्या अंशदानाची तरतूद आहे.

१८) शिक्षण व्यवस्था :- I) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा ताब्यात घेण्याची कार्यवाही अंतिम टप्यात आहे. पुर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण व्यवस्थापनासह माध्यमिक शिक्षणांतर्गत मराठी, हिंदी, गुजराथी व उर्दू माध्यमाच्या शाळांना सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त थंड पीण्याच्या पाण्याची यंत्रे, क्रिडासाहित्य, प्रयोग शाळेतील साहित्य, विद्युत जनित्र/इनव्हर्टर व्यवस्था इ. साधन सामुग्री पुरविणे या बाबींसाठी आवश्यक तरतूद, शाळागृह इमारतीची दुरुस्ती, जिल्हा परिषदेच्या शाळा प्रत्यक्ष महानगरपालिकेच्या ताब्यात येई पर्यंत प्राथमिक शिक्षण निधीची तरतूद तसेच देय प्राथमिक शिक्षण अंशदानाच्या तरतुदीमधून यापूर्वी अदा केलेली प्राथमिक शिक्षण निधीची रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कमेतून प्रत्यक्ष महानगरपालिकेमार्फत शालेय व्यवस्थापन इत्यादी बाबींसाठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ५ कोटी २० लक्ष व ₹ ५ कोटी ८९ लक्ष इतकी तरतूद आहे.

II) प्राथमिक व माध्यमिक शालेय शिष्यवृत्ती परिक्षा व इतर स्पर्धा परिक्षांमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या सर्वसाधारण प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर पारितोषिके देणेकामी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये प्रतिवर्षी ₹ ५ लक्ष इतकी स्वतंत्र तरतूद आहे. मागासवर्गीय व मुलींसाठीच्या स्वतंत्र तरतुदी मागासवर्गीय कल्याणकारी योजना व महिला बाल कल्याण योजनेअंतर्गत अन्यत्र नमुदप्रमाणे आहेत.

१९) वाचनालय व्यवस्था :- नवघर माणिकपूर येथे अद्यावत वाचनालय इमारतीचे काम सुरु असून अन्य प्रभागात देखील वाचनालय इमारत बांधकाम प्रस्तावित आहे. शहरपातळीवर विविध ठिकाणी वाचनालय व अभ्यासिका व्यवस्था उपलब्ध करणे, पुर्वीच्या शहरी विभागातील वाचनालयांचा दर्जा सुधारणे, वाचनालये व अभ्यासिका वर्षभर १२ तास सुरु ठेवणे सदर ठिकाणी सुरक्षीततेच्या दृष्टीने सी.सी. टिव्ही कॅमेरे उपलब्ध करुन देणे, थंड पिण्याच्या शुध्द पाण्याची व्यवस्था करणे, सुरक्षा रक्षक व प्रथमोपचार व्यवस्था उपलब्ध करणे,

वाळवी प्रतिबंधक किटकनाशके फवारणी करुन व पुस्तके बांधणी करुन पुस्तकांचे जतन करणे, संपुर्ण संगणकीकरणा अंती केंद्रीय ठिकाणी इ-ग्रंथालय सुरु करणे इत्यादी बाबींसाठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १ कोटी ४७ लक्ष ८० हजार व ₹ १ कोटी ५३ लक्ष ९० हजार इतकी तरतूद आहे. याशिवाय संस्था अनुदानांतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील ग्रंथालयांना अनुदान देण्याची स्वतंत्र तरतूद आहे. नवघर माणिकपूर विभागातील इंटरनेट सेवा व तदनुसार लाभार्थींची वाढती मागणी विचारात घेता शहर पातळीवर तुलनात्मक दृष्टया अधिक विकसित वाटणाऱ्या विभागामधे सदर सेवा नवघर माणिकपूर विभागाच्या धर्तीवर अंमलात आणली जाऊन इ-गव्हर्नन्स अंमलबजावणी शिर्षाअंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील संपुर्ण नागरीकांसाठी 'वाय फाय' सेवा उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

२०) सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम :- स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, शिवजयंती, महात्मा गांधी जयंती व सावित्रीबाई फुले इतर थोर राष्ट्रपुरुषांच्या जयंती इत्यादी कार्यक्रमासह वसई विजयोत्सव, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दिपोत्सव, दिपावली पहाट, पावसाळी संध्याकाळ, दिपावली संध्या, तिळगूळ कार्यक्रम, नाताळ गोठा, इद-ए-मिलाद इत्यादी इतिहास व संस्कृती जोपासना करणारे कार्यक्रम, सत्कार उत्सव समारंभ, व्याख्यानमाला व वकृत्व स्पर्धा, ग्रंथ संमेलन, गुणवंत शिक्षक सत्कार, विद्यार्थी गुणगौरव, महापौर चषक स्पर्धा, इत्यादी साठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ २ कोटी इतकी तरतूद आहे. सामाजिक आर्थिक सर्व्हेक्षणासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये प्रतिवर्षी ₹ १० लक्ष इतक्या महसुली खर्चाची प्राथमिक तरतूद आहे.

२१) युवकांसाठी विशेष कार्यक्रम : स्पर्धात्मक युगातील यशस्वीततेसाठी युवक व युवतींकरिता विशेष शैक्षणिक कार्यक्रम, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन व दहावीच्या विद्यार्थांसाठी वाचनमाला उपलब्ध करणे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेतील विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या पहिल्या १० विद्यार्थ्यांना प्रथम क्रमांकास ₹ १५ हजार, द्वितीय क्रमांकास ₹ १० हजार, तीसऱ्या क्रमांकास ₹ ५ हजार, व क्रमांक ४ ते १० यांना प्रत्येकी ₹ २ हजार प्रमाणे पारितोषीक व शिष्यवृत्ती देणे, तसेच शासनमान्य राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवरील परिक्षा व स्पर्धा परिक्षामध्ये पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य, शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप, सामुदायीक विवाह सोहळ्या अंतर्गत वर अथवा वराचे पालकांना प्रत्येकी ₹ १० हजार अनुदान याकामी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ १ कोटी इतकी तरतूद आहे. मागासवर्गीय विध्यार्थ्यांसाठी व मुलींसाठी शिष्यवृत्ती व पारितोषीकाची तरतुद राखीव तरतूदीअंतर्गत आहे. प्रभाग स्तरावर विविध ठिकाणे निश्चित करुन सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत मुले व मुलींची सेवाभावी डॉक्टरांच्या मदतीने मोफत वैद्यकिय तपासणी करुन गरजुंना मोफत चश्मे वाटप करणेकामी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये प्रतिवर्षी ₹ ५० लक्ष इतकी तरतुद रुग्णालय व्यवस्थापन अंतर्गत आहे.

महिला व युवक यांना रोजगार उपलब्धतेसाठी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेचा लाभ मिळवून देणे, स्थानिक कामगार मजुर संस्थांना व सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांना ₹ १५ लक्ष पर्यंतची कामे मिळवून देणेसाठी प्रयत्न केले जात आहेत.

२२) क्रिडा विषयक कार्यक्रम : (i) प्रभाग समिती निहाय शालेय कलाक्रिडा महोत्सवासाठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ २ कोटी १२ लक्ष इतकी तरतूद आहे.

(ii) वसई तालुका कलाक्रिडा महोत्सव समितीस तसेच जिमखाना व्यायामशाळा यांचे संचालन करणाऱ्या संस्थांसह इतर क्रिडा संस्थाना अनुदान देणे कामी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ १ कोटी २५ लक्ष इतकी तरतूद आहे.

(iii) महापौर मॅरेथॉन स्पर्धेस मिळालेला प्रतिसाद, यशस्वीतता व प्रत्यक्ष खर्चाचा विचार करुन सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ २ कोटी इतकी तरतूद आहे.

(iv) खेळ व संघ दत्तक घेणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर शासन मान्य स्पर्धांसाठी शालेय विद्यार्थ्यांचे क्रिडासंघ पाठवणेसाठी प्रायोजकत्व स्विकारणे, यासाठी महानगरपालिकेची क्रीडासमिती नियुक्त करुन खेळाडू, प्रशिक्षक व संघ सदस्यांना लागणारे क्रीडा साहित्य गणवेश / टी शर्ट, प्रवास खर्च व इतर अनुषांगीक खर्चासाठी अर्थसहाय्य मंजुर करणे, वर्ल्ड कप, ऑलिम्पीक, एशियाड, राष्ट्रकुल, राष्ट्रीय व इतर तत्सम स्पर्धांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंना अनुक्रमे ₹ ३ लक्ष, ₹ ३ लक्ष, ₹ २ लक्ष ₹ २ लक्ष ₹ १ लक्ष व ₹ १ लक्ष इतकी प्रोत्साहन पर रक्कम प्राथमिक खर्चासाठी मदत स्वरुपात अदा करणे अशा स्पर्धांमधील यशस्वी स्पर्धकांचा पारितोषीक देऊन सन्मान करणे तद्वतच शासन मान्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धा, ऑलिम्पीक स्पर्धा यामध्ये सहभाग घेणेसाठी निवड झालेल्या खेळाडू व संघाना अर्थसहाय्य करणे इत्यादी कामी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ ४ कोटी इतकी तरतुद आहे.

(v) नरविर चिमाजी आप्पा मैदान विकासाकरिता सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ २७ लक्ष ८८ हजार व ₹ १ कोटी इतकी तरतूद आहे.

(vi) जिमखाना/ व्यायामशाळा व्यवस्थापनासाठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ११ लक्ष २५ हजार व ₹ २८ लक्ष २५ हजार इतकी तरतूद आहे.

(vii) मा. लोकनेते श्री हितेंद्रजी ठाकूर यांनी विशेष प्रयत्नाने मिळवून दिलेल्या विशेष निधीतून विरार येथे ऑलिम्पिक साईजचा जलतरण तलाव साकारलेला आहे. वालीव येथील क्रिडांगणाच्या विकासासह संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी व सार्वजनिक मालकीची क्रिंडागणे जमिन मालकांसोबत चर्चा करुन विकसीत करणे. तसेच फुटबॉल, ॲथलेटिक्स, ट्रॅकिंग, हॉकी, टेनिस, बॉक्सिंग, बॅडमिंटन, क्रिकेटसारखा खेळांसाठी विशेष योजने खाली महानगरपालिकेच्या मालकीची बंदिस्त व खुली क्रिडांगणे विकसित करणेकरिता आवशक अर्थसंकल्पीय तरतूदी आहेत.

नविन क्रिडागंणासाठी भूसंपादनासह स्टेडियम बांधकाम व इतर क्रिडांगण विषयक कामांसाठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ३ कोटी ९० लक्ष व ₹ ५ कोटी इतकी तरतूद आहे.

क्रिडा विषयक कार्यक्रमांसाठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १५ कोटी ८९ लक्ष १३ हजार व ₹ १७ कोटी ९१ लक्ष ७५ हजार इतकी तरतूद आहे.

२३) संस्था अनुदाने :- विश्वस्त नोंदणीकृत रुग्णालय, निराधार व निराश्रीत मुलींसाठी कार्य करणाऱ्या संस्था व इतर संस्थाचा सामाजिक विकासातील अमुल्य सहभाग विचारात घेता अशा संस्थाना त्यांचे विशेष कार्यासाठी प्रोत्साहन देणेकामी अनुदान देणे तद्वतच विविध वर्गाच्या ग्रंथालयांना अनुदान देणे, महापौर सहाय्यता निधीला अंशदान देणे याकामी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ १ कोटी इतकी तरतूद आहे.

२४) सुवर्ण जयंती योजना :- सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ ४० लक्ष इतकी तरतूद आहे.

२५) उड्डाणपूल व्यवस्था :- विरार येथील रेल्वे फाटक क्र. ४० वरील उड्डाणपूल मा. लोकनेते श्री हितेंद्रजी ठाकूर, मा. खासदार श्री. बळीरामजी जाधव, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर, मा. आमदार श्री. विलासजी तरे यांच्या सातत्यपुर्ण पाठपुराव्याने अनेक अडचणींवर मात करुन व महानगरपालिकेच्या अधिकतम् अनुदानातून पुर्ण झाला आहे. महानगरपालिका क्षेत्रासाठी विविध ठिकाणी रस्ते उड्डाणपूल व्यवस्थेकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठपुरावा सुरु आहे. विराट नगर, नारिंगी, नालासोपारा, नवघर, वसई इ. मंजुर विकास आराखड्यातील विविध अत्यावश्यक ठिकाणी रेल्वे व रस्ते उड्डाणपूल व सर्विस रोड बांधकाम, विरार रेल्वे फाटक क्र. ४० पासुन महानगरपालिका कार्यालयापर्यंत उड्डाणपुलाचा जोड रस्ता व पुल, तसेच शहरांतर्गत इतर पूर्व पश्चिम जोडणारे पादचारी पूल, नायगाव पुल विकास यासाठी कर्ज परतफेडी व्यतिरिक्त अन्य कामे, कर्ज हप्ता, कर्ज निधीतील कामे, स्कायवॉकच्या कामासाठी अनुशंगिक खर्च यासाठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ८ कोटी ४१ लक्ष व ₹ १२ कोटी ७६ लक्ष इतकी तरतूद आहे.

२६) पाण्याचा पुन:वापर करणेसाठी उपाययोजना : मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर यांनी दूर दृष्टीने हाती घेऊन पुर्णत्वास नेलेल्या विविध पाणीपुरवठा योजनांमुळे वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात पाण्याचे दुर्भिक्ष टळलेले आहे. भविष्य कालीन योजनांसाठी देखिल त्यांचे विशेष प्रयत्न सातत्याने सुरु आहेत. तथापी पिण्याच्या पाण्या व्यतिरीक्त अन्य प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचा पुन:वापर करणे काळाची गरज असून त्यादृष्टीने बांधकाम परवानगी देताना विकासकांनी इमारतीमधे स्वतंत्र व्यवस्था करण्याचे बंधन

घातले जात आहे. त्याच वेळी सद्यस्थितीत जे मालमत्ता धारक पिण्याच्या पाण्याव्यतिरीक्त अन्य प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचा पुन: वापर करण्याची योजना महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या संमतीने अंमलात आणतील त्यांना पाणी पट्टीच्या देयकात २ % सवलत देण्याची तरतूद आहे.

२७) रेन वॉटर हार्वेस्टींग योजना : नव्याने विकसित केल्या जाणाऱ्या मालमत्तांसाठी रेन वॉटर हार्वेस्टींग योजनेची अंमलबजावणी सक्तीने करण्याचे प्रस्तावित असुन अस्तित्वात असणाऱ्या सध्याच्या मालमत्तांबाबत रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प अंमलात आणणाऱ्या मालमत्ता धारकांना याकामी प्रोत्साहन देणेकामी मालमत्ता करामधे सामान्य पाणीपट्टीचा भाग समाविष्ठ असल्याने मालमत्ता कराच्या दोन टक्के सवलत देण्याची तरतुद आहे.

२८) सौर ऊर्जा वापर :- विद्युत ऊर्जेची बचत करणेकामी महानगरपालिकेकडे प्रथम नोंदणी करुन गृहनिर्माण संस्थाच्या प्रांगणांमधे सौर ऊर्जेवरील दिवे व सोलर वॉटर हिटर चा वापर करण्याऱ्या व्यक्ती संस्थाना एकत्रित मालमत्ता कराच्या २% सवलत देण्याची तरतूद आहे.

२९) निर्सग ऋण प्रकल्प : भाभा अणू संशोधन केंद्र यांनी तयार केलेला निसर्ग ऋण प्रकल्प राबवून स्वत:च्या गृह निर्माण संस्थेतील कचरा स्वत:च्या सोसायटीमधेच निर्मूलन करणाऱ्या गृह निर्माण संस्थेस विशेष प्रोत्साहन देणेकामी एकत्रित मालमत्ता करामधे २% सवलत देण्याची तरतूद आहे.

३०) मालमत्ता धारकांना विमा संरक्षण : मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या ५ वर्षाच्या कराचा एकरकमी आगाऊ भरणा करणेस नागरिकांना प्रोत्साहन देणेसाठी प्रस्तावित १०% सुटीव्यतिरीक्त मालमत्ता धारकांच्या मालमत्तांना विमा संरक्षण देणेकामी ₹ १५ लक्ष तसेच अशा मालमत्ता धारकाच्या कुटुंबीयांना अपघाती विम्याइतके संरक्षण महानगरपालिकेमार्फत थेट देण्यासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ २ कोटी इतकी तरतूद आहे.

३१) महानगरपालिकेच्या मालमत्तांचा विमा : नैसर्गिक व इतर अनेक बाबींमुळे महानगरपालिकेच्या मालमत्तांना उदभवणाऱ्या संभाव्य धोक्यापासून विमा संरक्षण मिळवणेसाठी सक्तीची व आवश्यक उपाय योजना असल्याने जरुर तर शासकीय विमा निधी विभागाशी समन्वय साधून स्पर्धात्मक दर मागवून अल्पदराने विशेष संरक्षण देणारी विमा पत्र घेणेकामी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ ६० लक्ष इतकी तरतूद आहे.

३२) पर्यावरण संरक्षण कार्यक्रम :- अ) पर्यावरण अहवाल तयार करणे व तदनुसार अंमलबजावणी करणे यासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ २५ लक्ष व ₹ ७५ लक्ष इतकी तरतुद आहे.

ब) जिवदानी मंदिर ट्रस्ट व वन खात्याच्या संयुक्त विद्यमाने ५०० हेक्टर जागेत वनीकरण प्रकल्प सुरु आहे. सन २०११-१२ पासुन आतापर्यंत ३ लक्ष २० हजार झाडे लावण्यात आली आहेत. अद्यापही अधिक अधिक वृक्षारोपण केले जाणार आहे. हरित पट्टा ही संकल्पना ठराविक क्षेत्राकरिता मर्यादित न ठेवता संपुर्ण वसई हरित वसई म्हणून नावारुपाला आणणेस महानगरपालिका प्रयत्नशिल असुन येत्या वर्षात ६ लक्ष वृक्ष लागवड करणेचा महानगरपालिकेचा संकल्प असुन त्या दृष्टीने मोकळी जागा, वाया जाणारे पाणी याचा वापर करुन मासवण, उसगाव, पेल्हार इत्यादी ठिकाणी स्वत:ची नर्सरी तयार करणेत आली आहे. सर्व सेवा भावी संस्था व नागरिकांना झाडे लावणे व जगवणेसाठी विशेष सहाय्य व प्रोत्साहन देणेस महानगरपालिका प्रयत्नशील आहे. महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी कार्यरत असणाऱ्या मोठयाप्रमाणात वृक्षारोपण करणाऱ्या सामाजिक संस्थाना वृक्षारोपण व संवर्धनासाठी ५०% पर्यंत खर्च देणे व सार्वजनिक ठिकाणी वनखात्यामार्फत वृक्षारोपण व संवर्धन करणेकामी वनखात्याकडे प्रकल्पाप्रमाणे मागणी नुसार खर्चाची रक्कम जमा करुन वृक्षारोपण करण्याचा प्रस्ताव आहे. समाजातील व्यक्ती सस्थांना रोपे देताना दोन ते तीन वर्षाची जगवलेली रोपे दिल्यास त्याचे संगोपन सहज शक्य होते सबब पहिल्या टप्यात सदर रोपे महापालिकेच्या नर्सरीमधे जगवण्याचे काम झाले आहे. पर्यावरण संरक्षणाचे इतर कार्यक्रम, वृक्ष संरक्षण, वृक्ष गणना, नागरी वनीकरण, नागरी वनीकरण योजनेसाठी पाण्याचे टँकरची व्यवस्था करणे, नारिंगी टेकडीचा विकास प्रभावीपणे करुन हँगींग गार्डन निर्मितीसह वन्य प्राण्यासाठी अभय अरण्य, सर्पोद्यान, पक्षी उद्यान, वनस्पती उद्यान तसेच रोपांसाठी पिंजरे खरेदीसह वृक्ष निधी अंतर्गत इतर भांडवली कामे करणे कामी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ७ कोटी ८६ लक्ष ५५ हजार व ₹ १५ कोटी १३ लक्ष इतकी तरतूद आहे. मत्स्यालय व भुगर्भ उद्यान बी.ओ.टी तत्वावर विकसीत करण्याचे प्रस्तावित आहे.

३३) कत्तलखाना :- महापालिकेचे विस्तृत क्षेत्र विचारात घेता अनुज्ञेय प्राण्यांच्या शास्त्रशुद्ध कत्तलीसाठी शासन निर्देशाप्रमाणे अद्यावत सुसज्य कत्तलखाना निर्मिती बंधनकारक आहे. यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्रकल्प आराखडा तयार करण्यापासून देवनारच्या धर्तीवर प्रत्यक्ष बांधकामासाठी प्रकल्प खर्चाच्या १००% विशेष अनुदान मिळवणेचा प्रयत्न केला जाणार आहे. शासकिय जागा अधिग्रहीत करुन अथवा याकामी उपलब्ध होणाऱ्या अन्य आरक्षणाच्या ठिकाणी अद्यावत कत्तलखाना निर्मितीसाठी ₹ २ कोटी इतकी प्राथमिक तरतुद आहे.

३४) **अंध, अपंग व गतीमंदाकरीता कल्याणकारी योजना :-** उपलब्ध स्कायवॉक व उड्डाणपुलांजवळ अपंगांसाठी सरकते जिने व उव्दाहन, विविध महत्वाच्या सार्वजनिक ठिकाणी रॅम्पची व्यवस्था व इतर अपंग कल्याणकारी योजनांच्या भांडवली खर्चासह अंध, अपंग, गतीमंदांचे कल्याणासाठी कार्य करणाऱ्या बोळींज येथील अपंग पुर्नवसन केंद्रासह इतर संस्थांना अनुदान व अंध, अपंग, गतीमंद व्यक्तींना आवश्यक साहित्य पुरविणेकरीता सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ४ कोटी ६९ लक्ष ८२ हजार व ₹ ३ कोटी १८ लक्ष ८ हजार इतकी तरतूद आहे.

३५) **पाणी पुरवठा व्यवस्था :-** पापडखिंड, पेल्हार या ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या क्षमता १० एमएलडीपर्यंत वाढविल्या असुन २० एमएलडीची उसगांव योजना पुर्णत्वास आली आहे. १०० एमएलडी ची सुर्या योजना सुरु आहे.

महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या मुळ योजनांमधील अनावश्यक खर्चात काटकसर करुन ₹ ६० कोटीची बचत व ₹ १३२ कोटी वाढीव अनुदान अशी एकूण ₹ १९२ कोटी बचत केल्यामुळे आज पाणी सिडकोने आकारणी करावयाच्या ठरवलेल्या ₹ २० ते ₹ २५ प्रतिहजार लिटर या दराऐवजी ₹ ८/- प्रति हजार लिटर दराने उपलब्ध झाले आहे. भविष्यातील मागणी विचारात घेऊन २० वर्षापूर्वी केलेल्या उपाययोजनांच्या परिणाम स्वरुप महाराष्ट्रात इतरत्र पाणी टंचाईची समस्या असताना आपल्या शहरात पाणी कपात करावी लागली नाही. योजना मंजुर करणे, अनुदान मंजुर करणे, खर्च कपात करणे, व्याज व दंडनीय व्याज माफी मिळवणे या सर्व बाबी मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर यांच्या विशेष प्रयत्न व दूर दृष्टीच्या फलश्रुती आहेत.

मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर, मा. आमदार श्री. विलासजी तरे, मा. खासदार श्री. बळीरामजी जाधव यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे सन २०१३-१४ मध्येदेखील वसई नगरपरिषदेने पुर्वी अपरीहार्य कारणांमुळे थकीत ठेवलेल्या कर्जावरील विलंब आकार ₹ १४ लक्ष माफी प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत देखिल त्यांचेच विशेष पाठपुराव्याने, नविन पाणीपुरवठा योजना अंमलात येणार आहेत.

i) शहरातील १२ लाखापर्यत असलेली लोकसंख्या, वाढीचा दर व तदनुसार भविष्यातील वाढती मागणी लक्षात घेता भविष्यातील वाढणाऱ्या लोकसंख्येस पाणी पुरवठा करणेकामी याबाबतच्या वाढीव खर्चाचा भार देखील विकासकांवरच ठेऊन पाण्याचे नवीन स्त्रोत निर्माण केले जात आहेत.

ii) २०० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी पुरवठा करणाऱ्या सुसरी धरणासाठी ₹ १८ कोटी इतकी रक्कम महानगरपालिकेने भरणा केली असून देहरजा योजनेसाठी एन. पी. व्ही भरणेकरीता सन २०१३-१४ मध्ये ₹ १५२ कोटी व सन २०१४-१५ मध्ये ₹ २०० कोटी इतकी तरतुद आहे.

iii) कवडास धरणाची उंची वाढवून व गेट बांधून ७० दशलक्ष लिटर तसेच संपूर्ण जलवाहीनी खर्चासह इतर खर्च करुन उपलब्ध होऊ शकणारा १०० दशलक्ष लिटरचा वांद्री प्रकल्प राखून ठेवणेसाठी प्रयत्न सुरु आहेत.

iv) याव्यतिरीक्त ३५ दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी पुरवठा वितरण करणारे राजीवली सातिवली धरण, ६५ दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी पुरवठा करणारे कामण धरण, आणि ३५ दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी पुरवठा करणारे कोलसापाडा धरण तसेच धामणी व खडकवली धरणावरील योजनाचा पाठपुरावा करुन ३०० दक्षलक्ष पाणी स्त्रोत कर्ज निधीतून उपलब्ध करणेसाठी प्रयत्न सुरु आहेत.

v) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत ₹ २६९ कोटी खर्चाची १०० एमएलडी (विस्तारीत) सुर्या उद्‌भव योजना फेज २ मंजुर झाली असुन काम सूरु होणार आहे. यासाठी सन २०१३-१४ मध्ये ₹ १०९ कोटी व सन २०१४-१५ मध्ये ₹ १७३ कोटी इतकी तरतुद आहे.

vi) ₹ ९५८ कोटीची शहरांतर्गत पाणीपुरवठा योजना यु. आय. डी. एस. एस. टी / यु. आय. डी. एस. एस. एम. टी. योजनेअंतर्गत अंमलात येणार असुन यासाठी प्रथम टप्प्यात सन २०१४-१५ मध्ये ₹ २३९ कोटी ५० लक्ष इतकी तरतुद आहे.

vii )बंधारे हस्तांतरणासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये प्रतिवर्षी ₹ ५० लक्ष इतकी तरतुद आहे.

viii)पाणीपुरवठा प्रकल्प व जागामोजणी सर्व्हेक्षण खर्चासाठी सन २०१३-१४ मध्ये ₹ ३० लक्ष व सन २०१४-१५ मध्ये ₹ १ कोटी इतकी तरतुद आहे.

ix)अंतर्गत जलवाहीनी व्यवस्थेसाठी स्वनिधीतुन सन २०१३-१४ मध्ये ₹ १६ कोटी ३७ लक्ष व सन २०१४-१५ मध्ये ₹ ९ कोटी ११ लक्ष इतकी तरतुद आहे.

x)पाणीपुरवठा योजनेच्या कर्ज परतफेडीसाठी सन २०१३-१४ मध्ये ₹ ११ कोटी व सन २०१४-१५ मध्ये ₹ २६ कोटी २५ लक्ष ९८ हजार इतकी तरतुद आहे.

वरील प्रमाणे पाणी पुरवठा योजनांसाठी यु. आय. डी. एस. एस. टी / यु. आय. डी. एस. एस. एम. टी., महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजना अनुदान अथवा अन्य योजने अंतर्गत महानगरपालिका हिश्याचे अंशदान, बँक /एमएमआरडीए इत्यादी वित्तीय संस्थाकडून उभारण्यात येणाऱ्या अपेक्षित कर्जानुसार योजना खर्चाप्रमाणे कर्ज

परतफेड यासाठी सन २०१३-१४ मध्ये ₹ २७२ कोटी २० लक्ष व सन २०१४-१५ मध्ये ६३८ कोटी ७६ लक्ष इतकी तरतुद आहे.

शहरांतर्गत योजना दुरुस्ती देखभाल, जल शुध्दीकरण व्यवस्था, भुजल सर्व्हेक्षण, उसगाव व सुर्या योजना दुरुस्ती देखभाल, बिनतारी संदेश यंत्रणा, नविन व्हॉल्व खरेदी व व्हॉल्व चेंबर्स बांधकाम, पाण्याच्या टाकीची देखभाल, सार्वजनिक विहीरी व तलाव यातील गाळ काढणे, बोअरवेल खोदकाम व दुरुस्ती, सद्याचे नियमित कर्जपरतफेडीसाठी व इतर महसुली खर्चासाठी तरतूदी आहेत.

पाणी पुरवठा विभागांतर्गत नियमीत खर्चासह जल व ऊर्जा लेखापरिक्षण, बंधारा गेट व्यवस्था, मासवण बंधारा विषयक कामे, वसई रोड (पेल्हार प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेच्या नुतनीकरणा अंतर्गत, सॅडल डॅमचे मजबुतीकरण, इनटेकवेल येथील पाण्याची गळती थाबवणे, विश्राम गृह बांधकाम, धरणाच्या माथ्याची पावसाळ्यात होणारी धुप थांबवण्यासाठी पी.सी.सी. व रेलिंग करणे, रॅपिड सॅण्ड फिल्टरेशन प्लांटची उभारणी करणे, पिल्सचे सुशोभिकरण व उपांगाची रंग रंगोटी करणे, नविन जलवाहिनी व्यवस्था, पाणी पुरवठा उपांगासाठी कुंपण भिंती, व इतर भांडवली कामांसाठी आवशक खर्चाची तरतूद आहे.

पाणी पुरवठा सेवेसाठी सन २०१३-१४ मध्ये ₹ ३२९ कोटी ६५ लक्ष २४ हजार इतकी तरतुद असुन सन २०१४-१५ मधे यु. आय. डी. एस. एस. टी / यु. आय. डी. एस. एस. एम. टी. योजना अंदाजपत्रकातील ₹ २३९ कोटी ५० लक्ष तरतुदीसह ₹ ९३६ कोटी ६० लक्ष २३ हजार इतकी तरतुद आहे.

३६) **सुरक्षा व्यवस्था :-** रस्त्यावरील फेरीवाले व अतिक्रमण करणाऱ्या व्यक्ती संस्थामुळे नागरिकांना होणारा त्रास व रहदारीला होणारा अडथळा दुर करणे, महानगरपालिकेच्या मालमत्तेचे संरक्षण, उद्यान, तलाव इत्यादी ठिकाणी अबालवृध्दांचे संरक्षण तसेच तुटपुंजी पोलिस यंत्रणा विचारात घेता सामाजिक सुरक्षा योजनेंतर्गत स्थानिक पोलिस ठाण्यांना सुरक्षा रक्षक पुरवणे, महानगरपालिकेच्या प्रशासकीय व इतर विभागाच्या सुरक्षीततेसाठी हत्यारी व बिनहत्यारी पोलिस कायम स्वरुपी उपलब्ध करणे, रुग्णालय, कार्यालय व मुख्य वर्दळीच्या ठिकाणी व इतर आवशक ठिकाणी क्लोज सर्किट कॅमेरा व्यवस्थापन करणे प्रस्तावित आहे.

सुरक्षा साहित्यासाठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ २५ लक्ष व ₹ १ कोटी ५५ लक्ष इतकी तरतूद असुन ठेका आस्थापना खर्चांतर्गत नियमीत पोलिस संरक्षणासह सुरक्षा रक्षक ठेका पध्दतीने नेमणे कामी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनक्रमे ₹ ७ कोटी ४९ लक्ष व ₹ ७ कोटी ७९ लक्ष इतकी तरतूद आहे.

३७) **नाले खोदाई :-** पावसाळी पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होऊन शहरामधे पाणी तुंबून राहू नये यासाठी नियमीत नाले सफाईसह पावसाळ्यापूर्वी यांत्रिक साहित्याव्दारे नाले खोदाई करणेकामी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे प्रतिवर्षी ₹ ५ कोटी ९५ लक्ष इतकी स्वतंत्र तरतूद आहे.

३८) **सॅटेलाईट सिटी योजना :-** या योजनेअंतर्गत भुयारी गटर योजनेसाठी योजना प्रारंभापासुन नोव्हेंबर २०१३ अखेर ₹ १३ कोटी ४८ लक्ष ६८ हजार खर्च झालेला असुन सन २०१३-१४ मध्ये उर्वरीत कालावधीत ₹ ४९ कोटी ९२ लक्ष २५ हजार व सन २०१४-१५ मध्ये ₹ ३८३ कोटी ५९ लक्ष ७ हजार इतका खर्च अपेक्षित आहे. तद्वतच सन २०१५-१६-१७-१८ या वर्षात प्रतीवर्षी ₹ ३२२ कोटी खर्च अपेक्षित आहे.

घनकचरा व्यवस्थापनासाठी योजना प्रारंभापासुन नोव्हेंबर २०१३ पर्यंत ₹ १३ कोटी ८३ लक्ष ३८ हजार खर्च झालेला असुन सन २०१३-१४ मध्ये उर्वरीत कालावधीत ₹ १४ कोटी २६ लक्ष ७८ हजार व सन २०१४-१५ मध्ये ₹ १७ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

पाणीपुरवठ्यासाठी ₹ ९५८ कोटीच्या योजनेचा खर्च पाणीपुरवठा शिर्षाअंतर्गत नमुदप्रमाणे आहे.

या योजनेमधे कचरा उचलण्यासाठी अत्याधुनिक वाहने खरेदीसह पाणी पुरवठा व मलनिसा:रण, घनकचरा व्यवस्थापन, भुयारी गटार व्यवस्था, प्रस्तावित योजना सुधारणा व अंमलबजावणी क्षमता वाढवणे. मलनिसा:रण केंद्रे संपुर्ण महानगरपालिका क्षेत्रात प्रमुख ठिकाणी तेंरा पंप गृहांसह उभारणी करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करुन निरुपद्रवी पाणी समुद्रात खोलवर सोडणे, पावसाळी पाणी सखल भागात भरण्याची समस्या सोडवणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत वरीलप्रमाणे सन २०१३-१४ मध्ये ₹ ८३ कोटी ९५ लक्ष खर्च अपेक्षित असुन सन २०१४-१५ मधे पाणीपुरवठा योजनेच्या ₹ २३९ कोटी ५० लक्ष खर्चासह ₹ ६५७ कोटी ३५ लक्ष ४३ हजार खर्च अपेक्षित आहे.

३९) पर्यटन क्षेत्र, श्री क्षेत्र व ऐतिहासिक मालमत्तांचे सवंर्धन आणि विकास :- डेस्टिनेशन वसई या पर्यटन स्थळ निर्मितीच्या संकल्पपूर्ती साठी सर्वंकष प्रयत्न केले जाणार असून याद्वारे स्थानिकांना रोजगार उपलब्धीसह शहराचे सौदर्यीकरण होणार आहे. तसेच सांस्कृतीक वारसा जोपासला जाणार आहे. वसई विरार क्षेत्र तिसरी मुंबई स्वरुपात नावारुपाला येत आहे. मुंबई महानगरपालिके खालोखाल व्दितीय क्रमांकाचे कार्यक्षेत्र असणारी वसई विरार महापालिका आहे. आपल्या जवळ विस्तीर्ण समुद्र किनारा, तुंगारेश्वर सारखे अभय अरण्य, वज्रेश्वरी, सातीवली सारखे गरम पाण्याचे झरे, वैतरणाची विस्तिर्ण खाडी, निर्मळ, गणेशपुरी, जिवदानी मंदिर यासारखी भाविकांची श्रध्दास्थाने, आगाशी येथील जैन मंदिर,

वसईतील अनेक पुरातन चर्चेस, नालासोपारा येथील बौध्दस्तूप, वसई व अर्नाळा किल्ला अशी अनेक ठिकाणे असुन त्यापैकी महानगरपालिका क्षेत्रात येणारी सर्व ठिकाणे योग्य पध्दतीने विकसित केली जाणार आहेत. पर्यटन विकासाचे क्षेत्र विचारात घेता पर्यटन विकासास चालना देण्यासाठी आकर्षक पध्दतीने जाहिरात करणे, ब्रॅन्ड ॲम्बॅसेडर नेमणे इत्यादी कार्यवाही प्रस्तावित असून पर्यटन क्षेत्र, श्री क्षेत्र व ऐतिहासिक मालमत्तांचे संवर्धन आणि विकासासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ४२ लक्ष व ₹ ६० लक्ष इतकी तरतूद बांधकाम विभागांतर्गत आहे.

४०) त्रयस्थ पक्षीय तपासणी खर्च :- यासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ९१ लक्ष व ₹ १ कोटी ११ लक्ष ५० हजार इतकी तरतुद आहे.

४१) महिला बालकल्याण कार्यक्रम : बालवाडी तसेच प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपकरणे, वहया पुस्तके व खेळणी खरेदी, शाळांच्या आवश्यकतेनुसार संगणक पुरविणे, विशेष बालकांसाठी साहित्य पुरविणे व विशेष बालकांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देणे, शिलाई मशिन दुरुस्ती, शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी मोफत शैक्षणिक पास योजना, नागरी गरीब विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी सायकली वाटप, शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम, नोकरदार महिलांसाठी वसतीगृह, निराधार महिलांसाठी तात्पुरता निवारा केंद्र व जेष्ठ महिलांसाठी वृद्धाश्रम निर्मीती व त्यांचेसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य देणे, आरोग्य शिबीर व व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम, नोकरदार व व्यवयाय करणाऱ्या महिलांच्या लहान मुलांचे संगोपन व त्यांची देखभाल करण्याच्या दृष्टीने पाळणाघर निर्मिती व सेवाभावी नोंदणीकृत महिला गटांना पाळणाघर चालविणेसाठी अनुदान देणे, कुटूंबकल्याण कार्यक्रम, कुपोषित माता व बालकांसाठी सकस आहार, बालकांच्या विकासासाठी अन्य कार्यक्रम, महानगरपालिका रुग्णालयातील प्रसुती विभागातील रुग्णांना मोफत भोजन व अल्पोपहार अथवा पोषण व अल्पोपहार भत्ता, जननी शिशु सुरक्षा योजनेच्या लाभासह प्रसुत महिलांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर ₹ १६००/- इतका पोषण व आरोग्य भत्ता देणे, डायलेसिस उपचार स्वयंसेवी संस्थांमार्फत घेणाऱ्या मुली व महिलांना अनुदान देणे, मुली व मुलांना स्वयंसेवी संस्थांमार्फत दत्तक घेणाऱ्या पालकांना प्रोत्साहनात्मक अनुदान देणे, मुली व महिला यांचेकरीता तांत्रीक व व्यवसायीक प्रशिक्षण आयोजीत करणे, महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजनासाठी सभागृह व व्यवसायासाठी गाळे असलेली महानगरपालिका मालकीची बहुउद्देशिय इमारत प्रभाग स्तरावर मोक्याच्या ठिकाणी उपलब्ध करुन देणे, महिला बालकल्याण विभागाच्या विविध कार्यक्रमांच्या आयोजनासाठी प्रसिध्दी, पारितोषीके, मानधन, सत्कार साहित्य इत्यादी कार्यक्रमासाठीचा अनुषांगीक खर्च करणे, एड्स ने मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या विधवा पत्नीस वैयक्तिक

अर्थसहाय्य करणे, विधवा परितक्त्या महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविणे तसेच विधवा परितक्त्या महिलांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देणे, महिला सक्षमिकरणासाठी विविध उपक्रम राबविणे, सामुदायीक विवाह सोहळ्या अंतर्गत वधु अथवा वधुचे पालकाला प्रत्येकी **₹** १० हजार अनुदान देणे, बालचित्रपट महोत्सव, स्त्रीरोग चिकित्सा शिबीर, मुलींचे शाळा गळतीचे प्रमाण थांबवण्यासाठी प्रोत्साहन अनुदान, उत्कृष्ट कामाबद्दल महिलांचा गौरव, तसेच महिला बालकल्याण समिती मार्फत आयोजीत केल्या जाणाऱ्या इतर योजना व कार्यक्रमांसाठी आणि महीला व बालकल्याण योजनेंतर्गत भांडवली कामे यासाठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ १७ कोटी ७४ लक्ष ११ हजार व ₹ २० कोटी २० लक्ष ७१ हजार इतकी तरतूद आहे.

४२) जेष्ठ नागरीकांसाठी विशेष सुविधा :- जेष्ठ नागरीकांसाठी आरोग्य चिकीत्सा शिबीराचे आयोजन व त्यांचे डायलेसिस उपचारासाठीचा खर्च रुग्णालयांना अदा करणे करीता सन २०१३-१४ सन २०१४-१५ मध्ये अनुक्रमे ₹ ३९ लक्ष व ₹ ५० लक्ष इतकी तरतुद असुन विरंगुळा केंद्रासाठी सन २०१४-१५ मध्ये ₹ ५० लक्ष इतकी तरतुद आहे. जेष्ठांसाठी कार्यरत नोंदणीकृत संस्थांना अनुदान देणेची स्वतंत्र तरतुद आहे. या व्यतिरीक्त जेष्ठ नागरीकांना स्कायवॉक व उड्डाणपुलाजवळील सरकते जिने व उद्धाहनाची सेवा, परिवहन सेवेमध्ये ५०% प्रवास सवलत, मोक्याच्या ठिकाणी बैठक व्यवस्थेसाठी बाकडे, नाना - नानी पार्क, इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

४३) अल्पसंख्यांक कल्याण :- दफन भुमीच्या अन्यत्र नमुद स्वतंत्र तरतुदीव्यतिरीक्त अल्पसंख्यांक निधीतील कामासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये अनुक्रमे ₹ ४० लक्ष व ₹ ३० लक्ष इतकी विशेष तरतुद आहे.

४४) पी बजेट :- यामधे गरीब गरजूंसाठी मोफत वैद्यकीय शिबीर, समुह गटविमा योजनेखाली मेडिक्लेम सुविधा प्राप्त करुन देणे त्याचप्रमाणे अपघाती विमा संरक्षण देणे, दलित वस्ती सुधारणा योजनेंतर्गत अधिक अधिक अनुदान उपलब्ध करुन घेऊन सदर वसाहत सर्व सुविधायुक्त स्वच्छ व सुंदर करणे, राजीव आवास योजनेंतर्गत प्राथमिक ₹ ६० कोटीच्या प्रस्तावातुन महानगरपालिका क्षेत्रातील चाळी व झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करणे, द्रारिद्रय रेषेखालील व्यक्तींसाठी घरकुल योजना, मागासवर्गिय कल्याणकारी योजनेंतर्गत विकास कामे, विशेषत: नविन शहरी विभागात वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अनुदान देणे, नविन शहरी भागामधे शेतकामासाठी वनराई बंधारा बांधकाम, पाण्याचा काटकसरीने वापर व सर्व जलस्त्रोतांचा योग्य व पुरेपुर विनियोग करणेसाठी खाजगी नविन विहीरी खोदकामांसाठी अनुदान, शेती कामांसाठी व बागायतीसाठी साहित्य, विज पंप, फवारणी पंप, जंतुनाशके

बियाणे, खत, इतर शेत काम साहित्य पुरवठा, इ. शेतीविषयक कार्यक्रम राबवणे, वनराई बंधारा बांधकाम, मच्छीमार व बोटीवरील मजूर यांना त्यांचे कर्तव्य परिसरात आरोग्य सुविधा व फिरता दवाखाना उपलब्ध करुन देणे तसेच या क्षेत्रात सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी संस्था अनुदाना अंतर्गत अनुदान देणे, मच्छिमार बोटींसाठी जाळ्या, प्रथमोपचार पेटी (मेडिकल किट), सिग्नल लाईटसाठी बॅटरी व इतर आवश्यक साहित्य पुरविणे नैसर्गिक व इतर आपत्तीकाळात पोलिस मदतीसह हेलिकॅप्टर भाड्याने घेणे इ. मच्छिमारांसाठी कल्याणकारी योजना राबविणे, श्रमसाफल्य योजने अंतर्गत सफाई कामगार घरकुल/कामगार निवास बांधकाम, नागरी गरीब वस्तीमध्ये गटार बांधणे, रस्ता बांधकाम, इतर विकास कामे, दिवाबत्ती व्यवस्था इत्यादी बाबींचा समावेश आहे. मागासवर्गिय कल्याणकारी योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या योजनांसाठी ५% राखीव तरतूदीसह पी बजेट करीता सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ५६ कोटी ७ लक्ष ६३ हजार व ₹ ५९ कोटी ४८ लक्ष ६३ हजार इतकी तरतूद आहे.

४५) विशेष योजना :- मोनोरेल व रिंगरोड, पाणीपुरवठा योजना, उड्डाणपुल, पुर्व पश्चिम जोडणारे पुल, पर्यटन विकास प्रकल्प इ. जिव्हाळ्याच्या योजना यु. आय. डी. एस. एस. टी / यु. आय. डी. एस. एस. एम. टी. अनुदान निधीतुन अथवा अल्प व्याज दराने कर्ज निधीतुन पूर्ण करणेचा मानस असुन यासाठी विविध संस्था, शासकीय विभाग यांचे समवेत संपर्क साधून आवश्यक पूर्तता करुन देणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रत्यक्ष कामावर देखरेख ठेऊन प्रकल्प पूर्ण करणे इ. कामासाठी त्या त्या क्षेत्रातील तांत्रीक सल्लागार नेमणूक निविदा पध्दतीने करणे आवश्यक आहे. निविदाकार सर्वसाधारण पणे अंदाजपत्रकाच्या ५ ते ५.५० % फी आकारत असले तरी प्रकल्प यशस्वीपणे कार्यन्वित करणेसाठी त्यांची नियुक्ती फायदेशीर व आवश्यक ठरणार असल्याने सल्लागार नेमणूकीसह इतर अनुषंगीक खर्चासाठी सन २०१३-१४ व २०१४-१५ मधे अनुक्रमे ₹ ९ कोटी ९४ लक्ष व ₹ १२ कोटी इतकी प्राथमिक तरतुद आहे. तव्दतच विशेष योजनांसाठी कर्ज परतफेड व महानगरपालिका हिश्यासाठी खालीलप्रमाणे आवश्यक तरतुद आहेत.

| | मोनोरेलसह रिंगरोड प्रकल्प | | पाणीपुरवठा योजना | | रेल्वे उड्डाणपूल व पुर्व पश्चिम जोडणारे पुल | | इतर प्रकल्प | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सन | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१३-१४ | २०१४-१५ |
| कर्ज परतफेड तरतुद | ₹ ५५ लक्ष | ₹ २७ कोटी ३४ लक्ष | ₹ ११ कोटी | ₹ २६ कोटी २६ लक्ष | ₹ १० लक्ष | ₹ २५ लक्ष | ₹ ५८ लक्ष | ₹ ५८ लक्ष |
| म.न.पा. अंशदानासाठी कर्ज | ० | ₹ ७५ कोटी | ० | ₹ ३०० कोटी | ० | ० | ० | ₹ १ लक्ष |
| महानगरपालिकेचा खर्चातील हिस्सा | ० | ₹ १७ कोटी ४५ लक्ष | ₹ २०७ कोटी २० लक्ष | ₹ १५ कोटी ९५ लक्ष | ₹ ७ कोटी ६६ लक्ष | ₹ ३ कोटी ३६ लक्ष | ₹ १ लक्ष | ० |
| अनुदान हिस्सा | ० | ₹ ७५ कोटी | ₹ ५४ कोटी | ₹ २९६ कोटी ५५ लक्ष | ० | ₹ ३ कोटी | ० | ० |
| एकूण | ₹ ५५ लक्ष | ₹ १९४ कोटी ७९ लक्ष | ₹ २७२ कोटी २० लक्ष | ₹ ६३८ कोटी ७६ लक्ष | ₹ ७ कोटी ७६ लक्ष | ₹ ६ कोटी ६१ लक्ष | ₹ ५९ लक्ष | ₹ ५९ लक्ष |

प्राथमिक दृष्टीक्षेपातील अन्य विशेष योजना खालील प्रमाणे आहेत :-

- ★ कवडास, धामणी, खडकाळी, राजीवली, सातीवली, कामण, तिल्हेर, देहरजा, वांद्री, वैतरणा इ. इतर नवीन जल स्त्रोत विकास = ₹ ३५० कोटी
- ★ रिंगरोडसह एकात्मिक परिवहन व दळणवळण सुविधा प्रकल्प = ₹ ८०० कोटी
- ★ एकात्मिक किनारपट्टी विकास व पर्यावरण संवर्धन योजना = ₹ ३५० कोटी
- ★ आर्थिक दुर्बल घटकांसाठी व अल्प उत्पन्न गटासाठी गृहनिर्माण योजना व पायाभूत सुविधा विकास प्रकल्प = ₹ २५० कोटी
- ★ एकात्मिक पर्जन्य वाहिन्या विकास प्रकल्प = ₹ ५५० कोटी
- ★ घनकचरा व्यवस्थापन व क्षेपण भूमीविकास प्रकल्प = ₹ ५ कोटी
- ★ डेस्टिनेशन वसई या उपक्रमा अंतर्गत पर्यटन विकास प्रकल्प = ₹ २०० कोटी
- ★ शासकीय सुधारणा व उत्पन्न वृध्दी अंमलबजावणी प्रकल्प = ₹ १०० कोटी
- ★ विद्युत विभागाची विविध विकास कामे, विद्युत ऊर्जा बचतीचे प्रकल्प राबवणे, कार्बनक्रेडीट मिळवणे, विद्युत व्यवस्था आराखडे तयार करणे = ₹ १ कोटी

मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर सो. मा. खासदार श्री. बळीरामजी जाधव सो. मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर सो. मा. आमदार श्री. विलासजी तरे सो. व वसई - विरार शहर महानगरपालिकेचे मा. स्थायी समिती सभापती श्री. अजीवजी पाटील सो. यांनी अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यासाठी केलेल्या सुचनांचा अंर्तभाव सदर अर्थसंकल्पात त्या - त्या घटकामध्ये केलेला आहे.

सन २०१३-१४ च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०१४-१५ चे मुळ सर्वसाधारण अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक ‘अ’, महानगरपालिकेच्या ‘अ’ अंदाजपत्रकातील अंशदानासह पी बजेटचे अंदाज, जेण्डर बजेटचे अंदाज, अंध व अपंगांच्या कल्याणकारी योजनांसाठीच्या बजेटचे अंदाज, ब अंदाजपत्रकाकडे परिवहन सेवेकरीता वर्ग करावयाच्या अंशदानाचे अंदाज, जल मल प्रवाह निधी अंदाजपत्रक ‘क’, वृक्ष निधी अंदाजपत्रक, एकत्रित पाणीपुरवठा व मल प्रवाह विनियोग कर्ज निधी अंदाजपत्रक, अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट इन सॅटेलाईट टाउन/ कंटूर मॅग्नेटस ऑफ मिलियन प्लस सिरीज योजना निधीचे अंदाजपत्रक, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९५ (अ) नुसार, सन २०१२-२०१३ या कालावधीत अर्थसहाय्य देऊन पुरविलेल्या सेवांबाबतचा अहवाल व इतर आवश्यक सहपत्रासह सोबत सहर्ष सादर.

दिनांक:- ३०/०१/२०१४

**(गोविंद राठोड)**
**आयुक्त**
**वसई विरार शहर महानगरपालिका**